दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ८ वे I पाने ८ I मुल्य रू. ५.०० I अंक १७ I सोमवार २६ ऑक्टोबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर ● जळगाव ● धुळे ● नंदुरबार ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● धाराशिव ● लातूर ● नांदेड ● परभणी ● हिंगोली ● अमरावती ● अकोला ● यवतमाळ ● बुलढाणा ● वाशिम ● नागपूर ● वर्धा ● भंडारा ● गोंदिया ● चंद्रपूर ● गडचिरोली ● मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड ● रत्नागिरी ● सिंधुदुर्ग ● पुणे ● सातारा ● सांगली ● कोल्हापूर ● सोलापूर ● नाशिक

## टायगर श्रॉफवरील गोळीबार प्रकरणात प्रांजल ठाकरला अटक

**मुंबई :** अभिनेता टायगर शॉफ याच्यावर १८ ऑक्टोबर रोजी झालेल्या गोळीबाराच्या प्रयत्नाने मनोरंजनविश्वात खळबळ उडाली होती. हल्लेखोराची बंदूक ऐनवेळी लॉक झाल्याने संभाव्य अनर्थ टळला आणि टायगर शॉफ बचावला. आता या प्रकरणात पोलिसांनी अकराव्या आरोपीला अटक केली असून, प्रांजल ठाकर असे त्याचे नाव आहे. त्याला ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.पोलिसांनी प्रांजल ठाकरला इंदूर येथून ताब्यात घेतले. गोळीबारासाठी आलेल्या शूटरना मदत केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. तसेच, तो या प्रकरणातील मुख्य सूत्रधार अनिल पंडित याच्या थेट संपर्कात होता. अनिल पंडित आणि कुणाल यांच्यातील दुवा म्हणूनही प्रांजलने भूमिका बजावल्याचा संशय पोलिसांना आहे. विशेष म्हणजे, प्रांजल हा पदविकाधारक अभियंता असून, मुख्य सूत्रधाराचा निकटवर्तीय म्हणून त्याची ओळख असल्याचे सांगितले जाते. उच्चशिक्षण घेतलेल्या व्यक्तीचा अशा गंभीर गुन्ह्याच्या तपासात सहभाग समोर आल्याने या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.

# दुष्काळ निवारणासाठी २६० कोटींचा आराखडा

## अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाईचे सावट

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर: जिल्ह्यात आगामी जून महिन्यापर्यंत जाणवणाऱ्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा परिषदेने तब्बल २६० कोटी रुपयांच्या विविध उपाययोजनांचा आराखडा जिल्हा प्रशासनाकडे प्रस्तावित केला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या आराखड्याचा आढावा घेण्यात आला. यामध्ये नागरिकांसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यावर आणि जलस्रोत बळकटीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे.**

जिल्ह्याच्या विशेषतः दक्षिण भागात पाणीटंचाईचे चटके अधिक जाणवू लागले आहेत. सध्या जिल्ह्यातील १९३ गावे आणि १०९५ वाड्यावस्त्यांवरील सुमारे ३ लाख ८७ हजार लोकसंख्येला २०४ टँकर्सद्वारे दररोज पाण्याचा पुरवठा केला जात असून, रोज ८५६ खेपा सुरू आहेत.

जिल्हा परिषद दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीसाठी टंचाई निवारण आराखडा तयार करते. गेल्या वर्षी २९ कोटी, तर त्यापूर्वी ७० कोटींचा आराखडा मंजूर झाला होता. मात्र, यंदा टंचाईची तीव्रता अधिक असल्याने तरतुदीत मोठी वाढ करण्यात आली आहे.

सन २०१८-१९ मध्ये जिल्ह्यात टँकरची संख्या ८१५ पर्यंत पोहोचली होती. यंदा परिस्थिती त्याहून बिकट होण्याची शक्यता गृहीत धरून, केवळ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल १६९ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. उर्वरित निधीमधून जलस्रोतांचे बळकटीकरण, विहिरींचे खोलीकरण आणि नळपाणी योजनांची विशेष दुरुस्ती हाती घेतली जाणार आहे.



### उपाययोजना आणि प्रस्तावित खर्च

- टँकरने पाणीपुरवठा: १६९ कोटी रुपये
- २१० नळपाणी योजनांची विशेष दुरुस्ती: ५८ कोटी रुपये
- २१८ विहिरींचे खोलीकरण व गाळ काढणे: ७.९० कोटी रुपये
- प्रगतीपथावरील ५१ पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे: ६.९८ कोटी रुपये
- १०३ जलस्रोत बळकटीकरण कामे: ५.३७ कोटी रुपये
- ४९ तात्पुरत्या पूरक नळपाणी योजनांची दुरुस्ती: ४.४५ कोटी रुपये
- २०९ खासगी विहिरींचे अधिग्रहण: ३.१६ कोटी रुपये
- १०७ नवीन विंधनविहिरी घेणे: २.२४ कोटी रुपये
- टँकर भरण्याच्या १०७ उपाययोजना: २.२३ कोटी रुपये

# टोरेंट पॉवरचा प्रकल्प पर्यावरणपूरक कसा?

- आदित्य ठाकरेंचा सवाल
- मुख्यमंत्र्यांनी राज्याचे वाळवंट केलंय

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**रायगड :** कर्जत तालुक्यात प्रस्तावित टोरेंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. 'टोरेंट पॉवरचा हा प्रकल्प पर्यावरणपूरक कसा, हे सरकारने दाखवावे. राज्यभर झाडांची कत्तल सुरू असून, हे सर्व अदानी आणि बिल्डरांसाठी केले जात आहे,' असा आरोप त्यांनी केला.

राज्यात ३०० कोटी वृक्षलागवडीची घोषणा करण्यात आली होती. मात्र, ही झाडे नेमकी कुठे आहेत? झाडे ऑनलाइन लावली का, असा खोचक सवालही आदित्य ठाकरे यांनी उपस्थित



केला. मुख्यमंत्री राज्याचे वाळवंट करत असल्याची टीकाही त्यांनी केली. कर्जत-भीमाशंकर परिसरातील जंगलतोडीच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारला धारेवर धरले. या जंगलतोडीची पाहणी आपण करणार असून, मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे देखील पाहणीसाठी जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यातील पाणीप्रश्न आणि वाहतूक कोंडीच्या मुद्द्यावरूनही **(पान ४ वर)**

## एका बाजूला दुष्काळाच्या झळा, दुसरीकडे अधिवेशनावर १२९ कोटींचा खर्च!

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** कुठे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, कुठे जनावरांच्या चाऱ्याची चिंता, तर कुठे पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड राज्यातील दुष्काळाची तीव्रता वाढत असताना सर्वसामान्य नागरिकांसमोर जगण्याचे प्रश्न उभे राहत आहेत. अशा परिस्थितीत एकीकडे सरकारी विभागांना खर्चकपातीचे निर्देश दिले जात असताना, दुसरीकडे नागपूर येथे होणाऱ्या **(पान ४ वर)**



### महत्त्वाचे..

**दिवाळीपूर्वी सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण!**

**पुणे :** दिवाळी आणि धनत्रयोदशीच्या पार्श्वभूमीवर सोने-चांदी खरेदीचा विचार करणाऱ्या ग्राहकांसाठी दिलासादायक बातमी आहे. देशांतर्गत सराफ बाजारासह मल्टी कमोडिटी एक्सचेंजमध्ये (एमसीएक्स) सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. गेल्या काही दिवसांतील घसरणीमुळे मौल्यवान धातूंच्या किमती विक्रमी उच्चांकापासून बऱ्याच खाली आल्या आहेत.

२३ ऑक्टोबर रोजी वायदेबाजारात चांदीचा दर प्रति किलो १ लाख ९२ हजार ८०० रुपयांपर्यंत घसरला. गेल्या दहा सत्रांत चांदीच्या दरात ३२ हजार ९५५ रुपयांची घट झाली. जानेवारीतील विक्रमी उच्चांकाच्या तुलनेत चांदीचे दर ५३ टक्क्यांहून अधिक खाली आले आहेत. दुसरीकडे, सोन्याच्या दरातही मोठी घसरण झाली असून, वायदेबाजारात सोन्याचा भाव प्रति दहा ग्रॅम १ लाख ४२ हजार रुपयांच्या खाली घसरला.

# महागाईच्या विळख्यात जग

## युरोपमध्ये जनक्षोभ, भारतातही जीवनखर्चाचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** वाढता जीवनखर्च, घरांच्या किमती, रोजगाराच्या समस्या आणि सरकारी धोरणांविषयीचा असंतोष यामुळे जगातील अनेक देशांमध्ये नागरिकांच्या आर्थिक अडचणींचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. युरोपातील फ्रान्स, अल्बानिया, स्पेन, इटली आणि पोर्तुगाल या देशांमध्ये विविध मागण्यांसाठी आंदोलने होत असल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी आंदोलनांना हिंसक वळण लागल्याने आंदोलक आणि पोलिसांमध्ये संघर्षही झाला. दुसरीकडे, भारतातही महागाई, वाढता घरखर्च आणि उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचे वाढते प्रमाण यामुळे सर्वसामान्य नागरिकांसमोर आर्थिक आव्हाने निर्माण झाली आहेत.




फ्रान्सची राजधानी पॅरिसपासून अल्बानियाची राजधानी तिराना तसेच माद्रिद, रोम आणि लिस्बन या शहरांमध्ये विविध सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांवरून नागरिकांचा असंतोष व्यक्त होत आहे.




वाढते घरभाडे, महागाई, सरकारी धोरणे आणि सामाजिक प्रश्न हे अनेक देशांतील आंदोलनांमागील महत्त्वाचे मुद्दे आहेत. मात्र, प्रत्येक देशातील आंदोलनांची कारणे आणि स्वरूप वेगवेगळे असल्याने या सर्व आंदोलनांना केवळ महागाईविरोधी आंदोलन म्हणणे योग्य ठरणार नाही.

फ्रान्समधील आंदोलनांदरम्यान पोलिसांकडून आंदोलकांना ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी काळे कपडे परिधान केलेल्या आंदोलकांकडून हिंसक प्रकार घडल्याचेही सांगण्यात आले. अल्बानियाची राजधानी तिराना येथे सरकारविरोधी आंदोलनादरम्यान पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रुधुराचा वापर केल्याचे वृत्त आहे. सरकारी इमारतींवर हल्ले झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. या घटनांमुळे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे. **(पान ४ वर)**

# ४५०० ची पहिली उचल जाहीर करा

## अन्यथा कारखाने सुरू करू देणार नाही : राजू शेट्टी

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेची विराट रॅली; ऊस दरावरून आंदोलन तीव्र**

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कोल्हापूर :** चालू ऊस गळीत हंगामात उसाला प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल जाहीर केल्याशिवाय साखर कारखाने सुरू करू देणार नाही, असा ठाम इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्ह्यात विराट



मोटारसायकल रॅली काढून ऊसदराच्या प्रश्नावर शेतकऱ्यांना संघटित करण्यात आले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या दरासाठी संघटनेने आक्रमक भूमिका घेतल्याने गळीत हंगामाच्या प्रारंभीच ऊसदराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ऊस उत्पादनासाठी लागणारा वाढता खर्च, खते-बियाण्यांचे दर, मजुरी, शेतीची मशागत आणि वाहतूक खर्च यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. उसाचे उत्पादन घेण्यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागत असताना त्याला मिळणारा दर खर्चाच्या तुलनेत पुरेसा असावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामासाठी प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल जाहीर करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. राजू शेट्टी यांच्या **(पान ४ वर)**

### पुण्यात भाईगिरीचा उच्छाद...

# १६ वर्षीय मुलावर कोयत्याने हल्ला!

## पुण्यातील उत्तमनगरमधील घटना, दोघे अटकेत

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** परिसरात भाईगिरी करण्याच्या वादातून आणि खुन्नसने पाहत असल्याच्या संशयावरून तिघांनी मिळून १६ वर्षीय मुलावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केला. पुण्यातील शिवणे परिसरात २३ ऑक्टोबर रोजी रात्री ही घटना घडली.

**डोक्यावर दोन वार; दोन्ही हातांवरही वार**

या हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर वारजे येथील माई मंगेशकर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी दोघांना अटक केली असून, तिघांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.सुशांत विलास ढिले (वय ३२) आणि सचिन राजू मारणे (वय २६) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या दोन दिवस आधी सुशांतने जखमी मुलाला व त्याच्या मित्राला दुचाकीवरून जाताना अडवून, 'मी इथला भाई आहे, माझ्या नादाला लागू नका,' अशी धमकी दिली होती. २३ ऑक्टोबरच्या रात्री मुलगा मित्रांसह गुरुपुष्प रेसिडेन्सीसमोरील मोकळ्या जागेत मोबाईलवर खेळत बसला होता. त्यावेळी तिघे आरोपी तेथे आले. 'हाच तो, जो माझ्याकडे खुन्नसने बघतो. आज याला जिवंत सोडायचे नाही,' असे म्हणत सुशांतने कोयत्याने मुलाच्या डोक्यावर दोन वार केले. सचिननेही धारदार शस्त्राने त्याच्या दोन्ही हातांवर वार केले. रक्तबंबाळ अवस्थेत मुलाने पळ काढून जवळच्या दुकानात आश्रय घेतला. उत्तमनगर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# अवैध धंद्यांवर पोलिसांचे छापे, लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट

## श्रीगोंदा कारखान्यातील दोन महिलांवर कारवाई

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**दै. राष्ट्रसह्याद्री इफेक्ट**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा फॅक्टरी परिसरातील हातभट्टीच्या गावठी दारूचा व्यवसाय आणि अवैध धंद्यांबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा फॅक्टरी, लिंपणगाव आणि काष्टी परिसरात पोलिसांनी छापेमारीची मोहीम राबवली. या कारवाईत लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून, श्रीगोंदा कारखाना येथील दोन महिलांवर कारवाई करण्यात आली आहे.

कलावती अनंता पवार आणि संगीता चरणदास काळे (दोघी रा. श्रीगोंदा कारखाना) अशी कारवाई करण्यात आलेल्या महिलांची नावे आहेत.श्रीगोंदा फॅक्टरी परिसरात हातभट्टीच्या गावठी दारूचा व्यवसाय पुन्हा फोफावत असल्याच्या तक्रारी होत्या. यापूर्वीही राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी अनेकदा छापे टाकून कच्चा माल व तयार दारू नष्ट केली होती. मात्र, कारवाईनंतरही अवैध व्यवसाय पुन्हा सुरू होत असल्याच्या तक्रारींमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत होते.

या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. केवळ छापे टाकून न थांबता अवैध दारू तयार करणारे, तिची वाहतूक करणारे आणि विक्री करणारे यांची साखळी उघड करून कायमस्वरूपी कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे



**पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार भैलुमे, आनंद मैड, राहुल मोडाळे, सचिन देवकाते, जमुना बजंगे यांच्यासह अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### अवैध धंद्यांना कायमचा आळा बसणार का?

**श्रीगोंदा फॅक्टरी, लिंपणगाव आणि काष्टी परिसरात झालेल्या कारवाईनंतर अवैध व्यवसायांना कायमचा आळा बसणार का, की काही दिवसांनी हे धंदे पुन्हा सुरू होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पोलिसांनी अशा अवैध व्यवसायांविरोधात सातत्याने मोहीम राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

## टोळीप्रमुख भोसले, बोकड्या काळेसह ११ जणांवर मोक्का

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर:** दरोडे, जबरी चोरी, घरफोडी, खुनाचा प्रयत्न आणि अल्पवयीन मुलींवरील अत्याचारासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमानुसार (मोक्का) कारवाई केली आहे. टोळीप्रमुख भोसले आणि बोकड्या काळे यांच्यासह एकूण ११ जणांवर ही कारवाई करण्यात आली असून, या कारवाईमुळे गुन्हेगारी टोळ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**दरोडे व खुनाच्या प्रयत्नासह गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभाग**

श्रीरामपूर उपविभागातील या गुन्हेगारी टोळीविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. संघटित पद्धतीने गुन्हे करून आर्थिक फायदा मिळवणे, नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे आणि वारंवार गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी होणे, अशा बाबींच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही कठोर कारवाई केली आहे. ह्या बातमीतील हकीगत अशी की, टोळी प्रमुख रमेश सावत्या भोसले, वय ३८ वर्षे,रा.पिंपळगाव कौडा, ता. पारनेर व टोळी सदस्य, **(पान ४ वर)**

# ५०० कोटींच्या ध्वनिफितीचे सत्य उघड करा ...

राजकारणात आरोप-प्रत्यारोप होतात, सत्तेसाठी डावपेच आखले जातात आणि विरोधकांना अडचणीत आणण्यासाठी वेगवेगळ्या खेळ्या खेळल्या जातात. मात्र, या सगळ्या संघर्षात सत्याचा बळी जाता कामा नये. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्यापर्यंत पाचशे कोटी रुपये पोहोचविण्याच्या कथित व्यवहाराचा उल्लेख असलेली ध्वनिफीत समोर आल्याच्या दाव्याने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. हा कथित व्यवहार खरा असेल, तर तो गंभीर राजकीय अनैतिकतेचा विषय आहे. ध्वनिफीत बनावट असेल, तर ती तयार करून राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्नही तितकाच गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणाला वाचवायचे आणि कोणाला अडकवायचे, यापेक्षा सत्य काय आहे, हे शोधणे महत्त्वाचे आहे.

पाचशे कोटी रुपये हा काही किरकोळ आकडा नाही. एवढ्या मोठ्या रकमेच्या कथित व्यवहारामागे नेमके कोण होते? पैसा कोणी उभा केला? तो कोणामार्फत आणि कोणत्या उद्देशाने दिला जाणार होता? मराठा आरक्षण आंदोलनाचा प्रभाव कमी करण्यासाठी आर्थिक आमिष दाखविण्याचा प्रयत्न झाला होता का? की राजकीय नेत्यांची बदनामी करण्यासाठीच हा कथित प्रकार उभा करण्यात आला? हे प्रश्न महाराष्ट्रातील जनतेला पडणे स्वाभाविक आहे. मात्र, ध्वनिफीत समोर आली म्हणजे त्यातील आरोप सिद्ध झाले, असे मानता येणार नाही. संभाषणातील आवाजांची ओळख, ध्वनिमुद्रणाची सत्यता आणि त्याचा संदर्भ अद्याप स्वतंत्रपणे सिद्ध होणे आवश्यक आहे.

आरोप गंभीर आहेत म्हणून चौकशी झालीच पाहिजे; पण आरोप झाले आहेत म्हणून कोणालाही




दोषी ठरविता कामा नये. हाच या प्रकरणातील न्यायाचा मूलभूत निकष असला पाहिजे.

मराठा आरक्षणाचा प्रश्न लाखो कुटुंबांच्या भविष्याशी जोडलेला आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात अनेक आंदोलने झाली. तरुणांनी उपोषणे केली, मोर्चे काढले आणि सरकारकडे न्यायाची मागणी केली. या आंदोलनाचे नेतृत्व करताना मनोज जरांगे-पाटील यांना मोठा जनाधार मिळाला. आंदोलनाचे पडसाद निवडणुकीच्या राजकारणातही उमटले. त्यामुळे या आंदोलनाचा राजकीय प्रभाव कमी करण्यासाठी आर्थिक व्यवहाराची रणनीती आखण्यात आली होती का, हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. पण राजकीय प्रभाव आणि कथित आर्थिक व्यवहार यांची सरमिसळ करून चालणार नाही. त्यासाठी ठोस पुरावे आवश्यक आहेत.

जर आंदोलनाचे नेतृत्व आर्थिक आमिषाने प्रभावित करण्याचा प्रयत्न झाला असेल, तर तो जनतेच्या विश्वासाशी केलेला विश्वासघात ठरेल. आंदोलनाचा वापर राजकीय सौदेबाजीसाठी करण्याचा प्रयत्न झाला असेल, तर त्याचीही सत्यता समोर आली पाहिजे. उलट, आंदोलनाच्या नेत्याला बदनाम करण्यासाठी बनावट ध्वनिफीत तयार करण्यात आली असेल, तर त्यामागील सूत्रधारांवरही कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. आंदोलन विकत घेण्याचा प्रयत्न झाला असेल किंवा आंदोलनाच्या नावाने खोटे कथानक रचले गेले असेल, दोन्ही प्रकार लोकशाहीसाठी घातक आहेत.

या कथित ध्वनिफितीमुळे भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील संबंधांवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. ध्वनिफितीतील आवाज भाजपशी संबंधित व्यक्तींचे असल्याचे काही नेत्यांनी आरोप केले असून, काही नावेही चर्चेत आली आहेत. मात्र, या दाव्यांची सत्यता अद्याप सिद्ध झालेली नाही. त्यामुळे आरोपांच्या आधारे कोणत्याही पक्षाला किंवा व्यक्तीला दोषी ठरविणे योग्य ठरणार नाही. सत्ताधारी महायुतीमध्ये नेतृत्व, राजकीय प्रभाव आणि निवडणुकीतील श्रेय यांवरून मतभेद असू शकतात. पण अंतर्गत संघर्षातून गंभीर आरोपांची मालिका सुरू झाली आणि प्रत्येक पक्षाने आपल्या सोयीचा अर्थ लावला, तर जनतेसमोर सत्य येण्याऐवजी संशयाचे धुके अधिक गडद होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिल्याचे सांगितले जात आहे. ही योग्य सुरुवात आहे; परंतु चौकशीची घोषणा म्हणजे सत्य बाहेर आले, असे नाही. तपास निष्पक्ष, पारदर्शक आणि पुराव्यांवर आधारित असणे आवश्यक आहे.

या प्रकरणात मूळ ध्वनिमुद्रण कुठून आले, ते कोणी तयार केले, संभाषणातील व्यक्ती कोण आहेत आणि ध्वनिफितीत फेरफार झाला आहे का, याची तज्ज्ञांकडून तपासणी झाली पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने आवाज तयार केला आहे का, याचीही पडताळणी आवश्यक आहे. ध्वनिफितीचा प्रसार कोणी केला आणि त्यामागे काही हेतू होता का, हेही तपासले पाहिजे.

ध्वनिफीत अस्सल ठरल्यास कथित व्यवहाराशी संबंधित आर्थिक पुरावे, व्यक्तींची भूमिका आणि संभाव्य राजकीय हस्तक्षेप यांचा शोध घेतला पाहिजे. ती बनावट असल्याचे निष्पन्न झाल्यास ती तयार करणारे आणि जाणीवपूर्वक प्रसारित करणारे कोण आहेत, याची चौकशी झाली पाहिजे. तपासाची दिशा कोणाच्या राजकीय सोयीने ठरता कामा नये. सत्ताधारी असोत वा विरोधक, आंदोलनाचे नेते असोत वा राजकीय पदाधिकारी हे कायद्यापुढे सर्व समान आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणात गौप्यस्फोट होतात, आरोपांची राळ उडते आणि काही दिवसांनी प्रकरणे मागे पडतात. या प्रकरणात मात्र तसे होता कामा नये. पाचशे कोटींच्या कथित व्यवहाराचा आरोप हा केवळ पक्षीय संघर्षाचा विषय नसून सार्वजनिक जीवनातील पारदर्शकतेची कसोटी आहे. आरोप खरे असतील, तर संबंधितांची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. आरोप खोटे असतील, तर खोटे कथानक रचणाऱ्यांनाही कायद्याचा धाक दाखविला पाहिजे.

जनतेला राजकीय नाट्य नको, तर स्पष्ट उत्तरे हवी आहेत. मराठा आरक्षणासारख्या संवेदनशील प्रश्नाचा वापर राजकीय फायद्यासाठी झाला असेल, तर ते उघड झाले पाहिजे. आणि एखाद्या नेत्याची बदनामी करण्यासाठी कट रचला असेल, तर तोही उघड झाला पाहिजे. पाचशे कोटींच्या कथित व्यवहाराचे सत्य दडपले गेले, तर राजकीय व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास आणखी ढासळेल.

म्हणूनच या प्रकरणाची चौकशी कालमर्यादेत पूर्ण करून निष्कर्ष पुराव्यांसह जनतेसमोर मांडले पाहिजेत. राजकीय सोयीचा निकाल नव्हे, तर सत्यावर आधारित न्याय हाच या प्रकरणाचा अंतिम निकष असला पाहिजे.

## डॉ. अशोक ढवण यांची महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर नियुक्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण यांची महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कृषी विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी ही नियुक्ती केली आहे. विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी डॉ. ढवण यांचे स्वागत करून अभिनंदन केले. डॉ. ढवण यांनी नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेतून १९८० मध्ये कृषी पदव्युत्तर पदवी, तर १९८४ मध्ये आचार्य पदवी प्राप्त केली. परभणी येथील कृषी विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक ते विभागप्रमुख, सहयोगी अधिष्ठाता, प्राचार्य, विस्तार शिक्षण संचालक आणि शिक्षण संचालक अशा विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षणाचा त्यांना ३५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभारही त्यांनी सांभाळला आहे. अमेरिकेतील ओरेगॉन स्टेट विद्यापीठ आणि कॅलिफोर्निया विद्यापीठात त्यांनी संशोधनाचा अनुभव घेतला. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांत त्यांचे ५० हून अधिक संशोधन लेख प्रसिद्ध झाले आहेत. तसेच ७५ हून अधिक परिषदांमध्ये त्यांनी संशोधनपर सादरीकरणे आणि व्याख्याने दिली आहेत.

## अवैध धंद्यांविरोधात बातम्या देणाऱ्या पत्रकाराला 'गेम' करण्याची धमकी!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** पुणतांबा परिसरातील अवैध धंद्यांविरोधात बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या एका पत्रकाराला 'पुन्हा बातमी दिल्यास त्याचा गेम करू,' अशी धमकीवजा संदेश दिल्याची घटना समोर आली आहे. काही अवैध व्यवसाय करणाऱ्यांनी मध्यस्थामार्फत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या एका पदाधिकाऱ्यापर्यंत हा संदेश पोहोचविल्याची चर्चा असून, त्यानंतर संबंधित पत्रकाराला याची माहिती देण्यात आली. या प्रकारामुळे पुणतांबा परिसरात खळबळ उडाली आहे.पुणतांबा गावात मटका, जुगार, तसेच बेकायदा वाळू, मुरूम आणि माती उपशासह विविध अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. या व्यवसायांमधून काही स्वतंत्र टोळ्या निर्माण झाल्या असून, त्यांच्यात वर्चस्वावरून संघर्ष होत असल्याचीही चर्चा आहे. या प्रकारांबाबत एक पत्रकार वेळोवेळी वृत्त प्रसिद्ध करीत असल्याने संबंधितांकडून नाराजी व्यक्त केली जात असल्याचे समजते.अवैध धंद्यांमुळे गावातील गुंडगिरी वाढत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे. या व्यवसायांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पोलीस आणि महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## देवगड येथे कामगारांचे आजपासून राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे १७ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर नेवासा तालुक्यातील तीर्थक्षेत्र देवगड येथे होणार आहे. श्री समर्थ सदगुरू किसनगिरीबाबा सेवकाश्रम, देवगड येथे सोमवार दि.२६ ते २८ ऑक्टोबर २०२६ या तीन दिवसाच्या दरम्यान या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात राज्यभरातील २०० हून अधिक कामगारांना भजन,कीर्तन आणि पारंपारिक संगीताचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार आहे.प्रसिद्ध भजनाचार्य ह.भ.प. कृष्णा महाराज उगले हे शिबिर संचालक म्हणून काम पाहणार असून त्यांच्यासह पाच प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यक्रमाचा उदघाटन सोहळा सोमवार,(दि.२६) ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता शिबिराचे उदघाटन राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते होणार आहे.तर प्रमुख अतिथी म्हणून गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,खासदार भाऊसाहेब वाकचौरे,आमदार विठ्ठलराव लंघे,लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आमदार डॉ.नरेंद्र घुले पाटील,उपसचिव महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या रोशनी कदम-पाटील उपस्थित राहणार आहे.या कार्यक्रमाचा समारोप सोहळा बुधवार,दि. २८ ऑक्टोबर रोजी सायं. ५ वाजता होणार आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर साखर कारखाना कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, अशोक सहकारी साखर कारखाचे कार्यकारी संचालक संतोष देवकर, मुळा सहकारी साखर कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद बेलेकर, मुकिंदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख सुनिलगिरी महाराज उपस्थित राहणार आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त नंदलाल राठोड,नाशिक विभागाच्या सहाय्यक कल्याण आयुक्त भावना बच्छाव व विभागातील कर्मचारी विशेष परिश्रम घेत आहेत.

## ऊसतोडणी मजुरांना बिबट्यापासून बचावाचे धडे

### बछडे आढळल्यास जवळ जाऊ नका; वनविभागाचे आवाहन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**माळवाडगाव :** ऊसतोडणी सुरू असताना बिबट्याची पिल्ले आढळल्यास त्यांच्याजवळ जाणे टाळावे, तसेच लहान मुलांना सुरक्षित अंतरावर ठेवून संपूर्ण कुटुंबासह ऊसाच्या फडातून बाहेर पडावे, असे आवाहन वनविभागाच्या पथकाने केले आहे. माळवाडगाव येथे ऊसतोडणी मजुरांना बिबट्यापासून बचाव करण्यासाठी वनरक्षकांनी मार्गदर्शन केले. चार दिवसांपूर्वी विजय दत्तात्रय आदिक, बाळासाहेब दत्तात्रय आदिक यांच्यासह अन्य शेतकऱ्यांच्या शेतातील ऊसाला शॉर्टसर्किटमुळे आग लागली होती. या आगीतून बचाव करण्यासाठी एक बिबट्या आणि काही रानडुकरे ऊसाच्या फडातून बाहेर पळाल्याचे दिसून आले. या घटनेनंतर बिबट्याची मादी आपल्या पिल्लांना ऊसाच्या फडात सोडून गेली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे मादी पुन्हा या परिसरात येण्याची शक्यता लक्षात घेऊन कोपरगाव उपविभागीय वनक्षेत्रपाल कार्यालयाच्या पथकाने आदिक यांच्या ऊसतोडणीच्या ठिकाणी भेट देत मजुरांना सतर्कतेच्या सूचना दिल्या.

सकाळी ऊसतोडणी सुरू करताना वातावरण थंड असते. रात्री शिकारीसाठी भटकंती करणारे बिबटे उबदार वातावरणाच्या शोधात ऊसाच्या फडात आश्रय घेत असू शकतात. त्यामुळे ऊसतोडणी सुरू करण्यापूर्वी मजुरांनी एकमेकांशी मोठ्याने बोलावे किंवा गाणी म्हणावीत, जेणेकरून फडात वन्यप्राणी असल्यास ते सावध होऊन दूर जाण्याची शक्यता असते, असे वनरक्षकांनी सांगितले.

ऊसतोडणी सुरू असताना लहान मुलांना खेळताना बिबट्याची पिल्ले आढळल्यास ती मांजराची पिल्ले समजून त्यांच्याजवळ जाण्याची शक्यता असते. मात्र, पिल्लांच्या जवळपास बिबट्याची मादी असू शकते. पिल्लांना धोका जाणवल्यास मादी आक्रमक होऊन मजुरांच्या समूहावरही हल्ला करू शकते. त्यामुळे पिल्लांना स्पर्श करू नये, त्यांना उचलण्याचा किंवा हुसकावून लावण्याचा प्रयत्न करू नये. अशा वेळी शांतपणे सुरक्षित अंतर राखून त्या ठिकाणाहून दूर व्हावे आणि तातडीने वनविभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले. वनविभागाच्या पथकाने दिलेल्या सूचना ऊसतोडणी मजुरांनी लक्षपूर्वक ऐकून घेतल्या. या वेळी वनरक्षक आर. डी. कानडे, ए. ए. बडे, व्ही. एस. बगळे आणि प्राणीमित्र अजित परांडे उपस्थित होते.

## चमत्कारांमागील विज्ञान समजून घ्या, वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा !

### देवगावच्या श्रीराम विद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा प्रबोधनपर उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** विद्यार्थ्यांनी शालेय वयापासूनच विज्ञानाची ओढ निर्माण करून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला पाहिजे. प्रत्येक घटनेमागे काही ना काही कार्यकारणभाव असतो. त्यामुळे चमत्कार, भूतबाधा आणि श्रद्धेचा गैरवापर याबाबत चिकित्सक विचार करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अहिल्यानगर जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी केले.

नेवासा तालुक्यातील देवगाव येथील श्रीराम विद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सापा यांनी विविध चमत्कारांचे प्रात्यक्षिकांसह सादरीकरण करून त्यामागील वैज्ञानिक कारणे विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. चमत्कारांच्या दाव्यांची शास्त्रीय पद्धतीने तपासणी करून त्यातील फोलपणा कसा उघड करावा, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिलेखनवाडीचे सरपंच प्रा. भाऊसाहेब सावंत होते. प्रारंभी डॉ. नरेंद्र दाभोळकर आणि लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी विज्ञान-गणित प्रदर्शन आणि रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. सावंत यांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती विकसित करण्याची गरज व्यक्त केली. अज्ञानामुळे प्रगतीला अडथळे निर्माण होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी अंनिसचे जिल्हा समाजमाध्यम कार्यवाह सुखदेव फुलारी, सतीश केदार, राजेंद्र धस, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कचरदास गुंदेचा, प्राचार्य मच्छिंद्र शिंदे यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. सिकंदर शेख यांनी प्रास्ताविक, बाळासाहेब भगत यांनी स्वागत, तर भरतसिंह परदेशी यांनी सूत्रसंचालन केले.

## रुग्णांच्या तक्रारींसाठी महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांच्या कारभारावर लक्ष-ठेवणार बादल परदेशी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना वेळेत उपचार, आवश्यक औषधे आणि सन्मानपूर्वक वागणूक मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र, काही ठिकाणी डॉक्टरांची अनुपलब्धता, औषधांचा तुटवडा, तपासण्यांसाठी विलंब आणि रुग्णांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी समोर येत असल्याने रुग्णांच्या तक्रारींसाठी महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांच्या कारभारावर लक्ष ठेवणार असल्याची भूमिका राष्ट्रीय मानवाधिकार हक्क संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सुरेंद्रसिंह उर्फ बादल कैलास परदेशी यांनी घेतली आहे. या प्रश्नांकडे राज्य शासन आणि आरोग्य प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे,राज्यातील शासकीय रुग्णालये ही गरीब, गरजू आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचा महत्त्वाचा आधार आहेत. त्यामुळे रुग्णांना उपचारांसाठी अनावश्यक त्रास सहन करावा लागू नये. आरोग्यसेवेतील हलगर्जीपणा किंवा गैरसोयींबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करावी. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष झाले पाहिजे अशी मागणी परदेशी यांनी केली. राज्यातील कोणत्याही शासकीय रुग्णालयात अन्याय, उपचारांबाबत हलगर्जीपणा, औषधांचा तुटवडा किंवा आरोग्यसेवेसंदर्भात काही तक्रार असल्यास नागरिकांनी बादल परदेशी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.तक्रारदारांनी रुग्णालयाचे नाव, घटनेचा तपशील आणि उपलब्ध कागदपत्रे द्यावीत, जेणेकरून संबंधित प्रकरणाचा योग्य प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करता येईल.रुग्णांचे हक्क महत्त्वाचे आहेत; आरोग्यसेवेतील त्रुटींकडे दुर्लक्ष होता कामा नये अशी भूमिका बादल परदेशी यांनी व्यक्त केली.

## प्रसुती व स्त्री रोगशास्त्र विषयात डॉ. मयुरी खेवरे महाराष्ट्रात तिसऱ्या स्थानावर



**''हे यश माझ्यासाठी भावुक करणारे आहे'' - डॉ. मयुरी खेवरे**

''एक आई, पत्नी आणि डॉक्टर अशा तिहेरी भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडताना मिळालेले हे यश माझ्यासाठी अत्यंत भावुक आणि अभिमानास्पद आहे. माझ्या या कठीण प्रवासात माझे गुरुजन, कुटुंबीयांचे आशीर्वाद आणि पती योगेश सुंबे व बाळ पद्मराज यांची खंबीर साथ मिळाली, म्हणूनच मी हे साध्य करू शकले. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करून समाजाची अधिक तन्मयतेने सेवा करण्याची ऊर्जा या यशाने मला दिली आहे. यावेळी मयुरीचे अश्रू अनावर झाले होते.''

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** सहा महिन्यांच्या बाळाची जबाबदारी पेलवून वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणाचा अत्यंत कठीण अभ्यासक्रम या दोन्ही आघाड्यांवर खंबीरपणे उभ्या राहत डॉ. मयुरी भाऊसाहेब खेवरे - सुंबे यांनी यशाचे शिखर गाठले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (चणक्ढ), नाशिक आयोजित जलींशींऑळली ऋूसरशलेश्रेसू (प्रसूती व स्त्रीरोगशास्त्र) या विषयाच्या पदव्युत्तर परीक्षेत डॉ. मयुरी यांनी संपूर्ण महाराष्ट्रात तृतीय क्रमांक पटकावून सुवर्णयश संपादन केले. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल तालुक्यातील ग्रामस्थ, तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करून गौरव करण्यात आला.

वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षण आणि त्यातही 'प्रसूती व स्त्रीरोगशास्त्र' हा विषय अत्यंत आव्हानात्मक मानला जातो. परीक्षेच्या काळात डॉ. मयुरी यांचा मुलगा पद्मराज हा अवघ्या सहा महिन्यांचा होता. आई म्हणून बाळाची अविरत काळजी घेतानाच कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी अभ्यासाचे नियोजन केले. सातत्यपूर्ण मेहनत, अभ्यासातील चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी राज्यात तिसरा क्रमांक मिळवून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. शिवसेना नेते रावसाहेब खेवरे यांच्या त्या पुतणी आहेत. डॉ. मयुरी यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण तालुक्यासाठी आणि ग्रामीण भागातील मुलींसाठी अत्यंत अभिमानास्पद ठरले आहे. या यशाचे औचित्य साधून तालुक्यातील विविध नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी एकत्र येत डॉ.मयुरी खेवरे यांचा विशेष सन्मान केला.आईपण आणि स्वप्नपूर्ती यांचा सुंदर समतोल साधणाऱ्या डॉ. मयुरी यांचा हा प्रवास इतर महिला व वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.डॉ. मयुरी खेवरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल खेवरे कुटुंब, मित्रपरिवार, वैद्यकीय क्षेत्र आणि संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी डॉ. किशोर शिरसाठ,कैलास शेळके,विलास शिरसाठ, राजेंद्र गुंजाळ, भास्करराव शिरसाठ,अशोक कल्हापुरे,दीपक पंडित, दादासाहेब शिरसाठ,प्रशांत शिंदे, सुरेश म्हसे,संतोष शिरसाठ,दत्तात्रेय इंगोले,मच्छिंद्र शिरसाठ,आशिष गागरे,राजेंद्र शिरसाठ, सुनील शेलार,पोपट शिरसाठ,विजय शिरसाठ,अर्जुन कोकाटे, संजय कल्हापुरे,दत्तात्रेय गागरे,प्रवीण शिरसाठ,अमोल बोर्डे,गणेश लबडे,विठ्ठल वराळे, रमेश खुळे,अमोल पवार,सुरज पोटे,गणेश लबडे,राजेंद्र शिरसाठ,अशोक शिरसाठ, आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## राजवाड्यातील अतिक्रमणधारकांना हक्काचे उतारे

### डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते पत्रांचे वितरण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी:** शिर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील राजवाडा परिसरात शासकीय जागेवर निवासी स्वरूपात असलेली अतिक्रमणे नियमाकुल करण्याच्या प्रक्रियेला एक महत्त्वपूर्ण टप्पा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून या परिसरात वास्तव्यास असलेल्या पात्र लाभार्थी नागरिकांना त्यांच्या निवासस्थानांबाबत मालकी हक्काचे पट्टे देण्यासंदर्भातील आदेश भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या हस्ते नुकतेच वितरित करण्यात आले. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणांच्या प्रश्नामुळे नागरिकांच्या मनात निर्माण झालेली अनिश्चितता दूर होण्यास मोठी मदत होणार आहे.या विशेष कार्यक्रमाला शिर्डीच्या नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात यांच्यासह सर्व नगरसेवक, कमलाकर कोते, नितीन कोते, प्रतापराव जगताप आणि भूमी अभिलेख विभागाचे अधीक्षक डॉ. योगेश थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राजवाडा परिसरातील लाभार्थी नागरिकही यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घर हे प्रत्येक कुटुंबाच्या सुरक्षिततेचे आणि स्थैर्याचे मुख्य साधन असल्याने, अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लागणे ही त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या दृष्टीने अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाची बाब ठरली आहे.डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आदेशांचे वितरण झाल्याने लाभार्थी नागरिकांना त्यांच्या निवासस्थानासंदर्भातील हक्क निश्चित करणारी अधिकृत कागदपत्रे मिळाली आहेत. शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे नियमाकुल करताना पात्र लाभार्थ्यांना कायदेशीर प्रक्रियेनुसार हक्क उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमामुळे प्रशासकीय प्रक्रियेची भूमिका अधिक अधोरेखित झाली आहे. या आदेशांमुळे प्रभाग ६ मधील राजवाडा परिसरातील नागरिकांच्या निवासाच्या प्रश्नाला प्रशासकीय पातळीवर कायमचा दिलासा मिळण्याचा मार्ग आता सुकर झाला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानासाठी बाळासाहेब थोरात यांचा दौरा

## दिल्लीतील महारॅलीच्या तयारीचा आढावा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : 'वोट बचाओ, देश बचाओ' या अभियानाच्या तयारीसाठी काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य तथा महाराष्ट्राचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी शनिवारी मध्य प्रदेशातील भोपाळ, रायसेन आणि विदिशा या तीन जिल्ह्यांचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी जिल्हा काँग्रेस कमिट्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून अभियानाच्या तयारीचा आढावा घेतला. तसेच १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या महारॅलीच्या नियोजनाबाबत सूचना केल्या.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने थोरात यांची मध्य प्रदेशात या अभियानासाठी पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. मतदारांचा मतदानाचा अधिकार आणि लोकशाहीचे संरक्षण या उद्देशाने अभियान गावपातळीपर्यंत पोहोचविण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी आमदार देवेंद्र पटेल, आमदार रजनीश सिंह, माजी मंत्री राजकुमार पटेल, माजी आमदार शैलेंद्र पटेल, भोपाळ शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रवीण सक्सेना, ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनोखी मानसिंग पटेल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

भोपाळ येथील मध्य प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मुख्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत थोरात यांनी मतदार याद्यांमधील कथित अनियमितता, निवडणूक आयोगाची निष्पक्षता आणि विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेबाबत काँग्रेसची भूमिका मांडली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या कथित मतचोरीच्या मुद्द्याचा संदर्भ देत त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर टीका केली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा आणि एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, अशी काँग्रेसची मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर भोपाळ शहर व ग्रामीण काँग्रेस पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत मतदार याद्यांची पडताळणी, बूथस्तरीय संघटनात्मक यंत्रणा आणि जनजागृती कार्यक्रमांवर चर्चा झाली. पात्र मतदारांची नावे वगळली गेल्याच्या तक्रारींची माहिती संकलित करून नागरिकांना आवश्यक मदत करण्याच्या सूचना थोरात यांनी दिल्या.

रायसेन आणि विदिशा जिल्ह्यांतही त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. जिल्हा, तालुका आणि बूथस्तरावर समन्वय ठेवून अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

### दिल्लीतील महारॅलीसाठी तयारी

१ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या महारॅलीसाठी मध्य प्रदेशातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा सहभाग, संघटनात्मक समन्वय आणि पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. २५ नोव्हेंबरपर्यंत गावागावांत चौपाल, जनजागृती आणि मतदार संपर्क अभियान राबविण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले. प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अबाधित राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. ही लढाई केवळ काँग्रेसची नसून लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाची आहे, असे थोरात यांनी सांगितले. दरम्यान, सोमवारी (२६ ऑक्टोबर) ते राजगड आणि सिहोर जिल्ह्यांचा दौरा करून तेथील काँग्रेस पदाधिकाऱ्यांसोबत अभियानाच्या तयारीचा आढावा घेणार आहेत.

---

# मक्तापुरात नित्कृष्ट गहू, तांदुळाचे वाटप

## ग्रामस्थांना बरोबर घेऊन आंदोलन छेडु-गणेश झगरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील मक्तापूर गावामध्ये स्वस्त धान्य दुकानात खराब व नित्कृष्ट दर्जाच्या गहू व तांदळाचे वाटप केले जात असून याबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते व मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे पाटील यांनी याबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना निवेदन पाठवून तक्रार केली आहे.यामध्ये सुधारणा न झाल्यास त्रिव आंदोलन छेडले जाईल असा ईशारा गणेश झगरे यांनी दिला आहे.



गणेश झगरे यांनी तक्रारी अर्जात म्हटले आहे की रेशन ला आलेला तांदूळ नित्कृष्ट दर्जाचा असून खडे ही मोठ्या प्रमाणात आहे गावामध्ये खडे नेवासा येथून स्वस्त धान्य दुकानात हे मटेरियल पूर्णपणे खराब आले असून मक्तापूर ग्रामस्थांनी याबाबत नाराजी व्यक्त केली असल्याने आपण थेट वरिष्ठांचे याबाबत लक्ष वेधले आहे. सध्या तालुक्यामध्ये दुष्काळ परिस्थिती असताना मक्तापुर गावातील गोरगरीब लोकांनी स्वस्त धान्य दुकानातील हे नित्कृष्ट दर्जाचे धान्य खायचं का?असा सवाल गणेश झगरे यांनी केला आहे. याबाबत तहसीलदार यांनी देखील धान्य वितरणाकडे लक्ष द्यावे नित्कृष्ट धान्याची तपासणी करावी अशी मागणी केली असून या बाबत सुधारणा न झाल्यास त्रिव आंदोलन शिवसेना उबाठा व ग्रामस्थांना बरोबर घेऊन करू असा गणेश झगरे यांनी दिला आहे.

---

# तळेकर वस्ती येथे चंडिका माता महोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : येथे अत्यंत जागृत देवस्थान म्हणून ख्याती असलेल्या राजराजेश्वरी चंडिका माता मंदिरात सालाबादप्रमाणे याही वर्षी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेला हा उत्सव स्वर्गीय सूर्यभान आप्पाजी तळेकर यांनी सुरू केला होता. त्यांची ही धार्मिक व सामाजिक परंपरा आता त्यांचे नातू सागर रमेश तळेकर व अक्षय रमेश तळेकर अत्यंत श्रद्धेने व निष्ठेने पुढे चालवत आहेत. या जागृत देवस्थानात शिर्डी परिसरातील ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने साईभक्त दर्शनासाठी येत असतात.

कोजागिरी पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर श्री राजराजेश्वरी चंडिका मातेची महापूजा, सत्यनारायण पूजा आणि भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील शेकडो नागरिकांनी आणि भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. अन्नदान सागर भाऊ तळेकर,अक्षय तळेकर यांच्यावतीने करण्यात आले. या महोत्सवाच्या प्रसंगी भाजप युवा नेते नानासाहेब शिंदे , सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ संजय महाजन तसेच सामाजिक कार्यकर्ते नवनाथजी थोरे उपस्थित होते .

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सागर तळेकर, अक्षय तळेकर, गणेश सावंत, किरण तळेकर, सुजित तळेकर, दत्तू दातीर, हर्षद तळेकर, सुनील तळेकर, भैया केदार, मयूर पगार, अभिषेक लोखंडे, सागर मानेकर, सुभाष आहेर, सुधीर नवले, भूषण तळेकर, किशोर सावंत, सुयश तळेकर, पाराजी भगत, सचिन सुपेकर, सचिन दातीर, अनिल चौधरी, अनिकेत काटकर, प्रशांत थोरे, शुभम पठारे, विशाल उपाध्ये आणि कुणाल सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# चेक बाऊन्स प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : चेक बाऊन्स प्रकरणात आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध करण्यात फिर्यादीला अपयश आल्याने राहुरी येथील सहमुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती अनुपमा पारशेट्टी यांनी बाळासाहेब ज्ञानदेव पेरणे यांची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपीच्या वतीने ड. अशोक तनपुरे आणि ॲड. विजयसिंह तनपुरे यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

राहुरी येथील कांदा व्यापारी मनीष चुत्तर यांच्या सी. पी. ट्रेडिंग कंपनी या फर्मचे तांदुळवाडी येथे कांदा खरेदी-विक्रीचे आडत दुकान आहे. तांदुळवाडी येथील बाळासाहेब ज्ञानदेव पेरणे यांनी २०१३ मध्ये या दुकानातून ७ लाख ६४ हजार रुपयांचा कांदा खरेदी केला होता. या व्यवहारातील १ लाख ७७ हजार रुपयांच्या रकमेचा धनादेश त्यांनी व्यापारी चुत्तर यांना दिला होता. मात्र, संबंधित बँक खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने हा धनादेश वटला नाही.

त्यानंतर व्यापारी चुत्तर यांनी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स कायद्याच्या कलम १३८ अन्वये राहुरी न्यायालयात एससीसी क्रमांक ३८७/२०१४ हा खटला दाखल केला होता. या खटल्यात एकूण सहा साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

मात्र, कांदा खरेदीची बिले न्यायालयात सिद्ध करण्यात फिर्यादीला अपयश आले. तसेच मागणी नोटीस सिद्ध न होणे, आरोपीकडून कायदेशीररीत्या येणे असलेली रक्कम सिद्ध न होणे आणि संबंधित फिर्यादी फर्मला खटल्यात पक्षकार न करणे, या मुद्द्यांवर बचाव पक्षाच्या वकिलांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपी बाळासाहेब पेरणे यांची खटल्यातून निर्दोष मुक्तता केली.

---

# 'वडारवस्ती, संजय गांधी नगरमधील घरांचे उतारे नावावर करून देणार' : आ. अमोल खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : गेल्या चार दशकांपासून सत्ता आणि विविध पदे असतानाही संगमनेर शहरातील संजय गांधी नगर व वडारवस्ती परिसरातील नागरिकांच्या घरांच्या मालकी हक्काचा प्रश्न सुटलेला नाही. निवडणुकीपुरता नागरिकांचा वापर झाला; मात्र त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात आले, अशी टीका करत या परिसरातील नागरिकांच्या घरांचे उतारे त्यांच्या नावावर करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

वडारवस्ती येथील शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संजय गांधी नगर आणि वडारवस्तीतील नागरिक अनेक वर्षांपासून घरांच्या मालकी हक्काच्या प्रश्नाला सामोरे जात आहेत. घरांचे उतारे नावावर नसल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. त्यांना त्यांच्या हक्काच्या घराबाबत न्याय मिळावा आणि घरांच्या नोंदी त्यांच्या नावावर व्हाव्यात, यासाठी आपण पुढाकार घेतला आहे. नागरिकांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करू, असे खताळ यांनी सांगितले.

या प्रश्नासंदर्भात तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून यापूर्वीही पाठपुरावा करण्यात आला होता. मुंबईत बैठक घेण्यात आली होती, तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी अनिल कवडे यांनी परिसराची पाहणी केली होती. नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे खताळ यांनी स्पष्ट केले. संगमनेरमधील राजकीय परिवर्तनानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसू लागले आहे. सामान्य कुटुंबातून पुढे आल्याने नागरिकांच्या अडचणींची जाणीव असून, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

**गाव तेथे शिवसेना शाखा, घर तेथे शिवसैनिक**




तालुक्यातील प्रत्येक गावात, वाडी-वस्तीवर आणि शहरातील प्रत्येक प्रभागात शिवसेनेच्या शाखा उभारण्यात येणार आहेत. 'गाव तेथे शिवसेना शाखा आणि घर तेथे शिवसैनिक' या अभियानातून नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यावर भर दिला जाईल. महिलांचे संरक्षण, रोजगाराच्या संधी आणि बचत गटांच्या माध्यमातून कुटुंबांचे अर्थकारण मजबूत करण्याला प्राधान्य देण्यात येईल, असे खताळ यांनी सांगितले.

यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, माजी नगरसेवक आप्पा पवार, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, समीर ओझा, प्रकाश पवार, शाखाध्यक्ष अण्णा शिंदे, उपाध्यक्ष संजय शिंदे, सोमनाथ रणसुरे, संपत पवार, आकाश पवार, सुनील पवार, दिलीप पवार, मारुती चव्हाण, महिला उपजिल्हाप्रमुख दीपाली वाव्हळ, रेखा गलांडे यांच्यासह नागरिक व शिवसैनिक उपस्थित होते.

---

## द • ख • ल

### वाढदिवसानिमित्त मुख्याध्यापकांची शाळेला पुस्तकांची भेट

**श्रीरामपूर** : जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी सुरू असलेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानाला प्रोत्साहन देत नायगाव नवे येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रामदास काळोखे यांनी आपल्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या ग्रंथालयाला ५ हजार १०० रुपयांची पुस्तके भेट दिली. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत आणि त्यांच्यामध्ये वाचनसंस्कृती रुजावी, या उद्देशाने काळोखे यांनी हा उपक्रम राबविला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुखदेव लांडे, माजी अध्यक्ष अरुण भारसाकळ आणि समितीच्या सदस्यांच्या हस्ते पुस्तके शालेय ग्रंथालयात समाविष्ट करण्यात आली. या उपक्रमाबद्दल पालक, विद्यार्थी आणि समिती सदस्यांनी काळोखे यांचे अभिनंदन केले. गटशिक्षणाधिकारी दीपक त्रिभुवन, विस्तार अधिकारी दरंदले, केंद्रप्रमुख शितल गायकवाड यांच्यासह तालुक्यातील शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्पेलिंग बी स्पर्धेत नायगाव नवे शाळेची ईश्वरी लांडे तालुक्यात प्रथम



**श्रीरामपूर** : जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि विनोबा कार्यक्रम (ओपन लिंक फाउंडेशन) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी स्पेलिंग बी ही इंग्रजी शब्द पाठांतराची स्पर्धा सुरू केली आहे. ही स्पर्धा शाळा,केंद्र,तालुका आणि जिल्हा या विविध पातळीवर होत आहे. सेंट झेवियर्स स्कूल, श्रीरामपूर येथे झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा नायगाव नवे,या शाळेतील गुणी विद्यार्थिनी कु. ईश्वरी संपत लांडे हिने इयत्ता पाचवी-सहावी च्या गट क्रमांक दोन मध्ये आपल्या उत्कृष्ट पाठांतराच्या जोरावर तालुक्यामध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तसेच तिची जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिला मुख्याध्यापक रामदास काळोखे, वर्गशिक्षिका श्रीमती सुवर्णाकाळे,शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले. ईश्वरीच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे वतीने तिचा सत्कार करण्यात आला.

### श्रीरामपुरात ५० हून अधिक नवसाक्षरांनी दिली परीक्षा

**श्रीरामपूर** : केंद्र पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत श्रीरामपूर येथील दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेतील परीक्षा केंद्रावर ५० हून अधिक नवसाक्षरांनी परीक्षा दिली. रविवारी शाळेला सुटी असतानाही शिक्षकांनी उत्साहाने नियोजन करून परीक्षा यशस्वी केली. या उपक्रमांतर्गत शाळेतील शिक्षकांनी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले. निरक्षर व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना मार्गदर्शन व शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात आले. निरक्षर व्यक्तींना साक्षरतेच्या प्रवाहात आणणे, शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि वयाची मर्यादा शिक्षणाच्या आड येत नाही, हा संदेश देणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. गटशिक्षणाधिकारी दीपक त्रिभुवन यांनी परीक्षा केंद्राला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. परीक्षेतील सहभागाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांच्यासह शिक्षकांनी परीक्षेच्या नियोजनासाठी सहकार्य केले. ऑनलाइन नोंदणी, बैठक व्यवस्था, पर्यवेक्षण, प्रश्नपत्रिका तपासणी आणि परीक्षार्थी नोंदणीची जबाबदारी शिक्षकांनी पार पाडली. 'शिकूया, शिकवूया आणि साक्षर भारत घडवूया!' या संदेशातून साक्षर समाजनिर्मितीचे आवाहन करण्यात आले.

---

# अध्यक्ष पवार यांनी पदाची गरीमा राखली

## श्रेयवादापेक्षा कर्मचाऱ्यांना न्याय मिळणे महत्त्वाचे : डॉ. सुजय विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर विखे पाटील परिवाराने नेहमीच सातत्याने पाठपुरावा केला आहे. कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटत असतील, तर त्याचे श्रेय घेण्यापेक्षा त्यांना प्रत्यक्ष न्याय मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. संस्थेचा कारभार अत्यंत यशस्वीपणे सांभाळताना अध्यक्ष विठ्ठलराव पवार यांनी आपल्या पदाची गरीमा आणि प्रतिष्ठा उत्तम प्रकारे राखली आहे, अशा शब्दांत भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांचे कौतुक केले.

शिर्डी येथे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या वतीने आयोजित दीपावलीनिमित्त शिधावाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सभासद व कर्मचाऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात शिधावाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. विखे पाटील यांनी संस्थानच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, सेवाशर्ती, वेतनातील तफावत, पदोन्नती आणि



नवीन विश्वस्त मंडळाची नियुक्ती यासह शिर्डीच्या विकासावर सविस्तर भूमिका मांडली.

मागील दिवाळीच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार यंदा ४८८ कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त करतानाच, मागील विश्वस्त मंडळाने लागू केलेल्या किमान आठवी उत्तीर्णतेच्या अटीमुळे काही जुने कर्मचारी या प्रक्रियेपासून वंचित राहिल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. कोणावरही अन्याय होऊ नये हीच आपली भूमिका असून उर्वरित कर्मचारी, तसेच वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती आणि भरती नियमावलीचा प्रशासनाने सकारात्मकतेने फेरविचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. राजकीय श्रेयवादावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, लोकप्रतिनिधींच्या कामाचे अंतिम मूल्यमापन मतदारच करत असतात. कोणाच्या आरोपांमुळे विखे पाटील परिवाराचे राजकीय भविष्य ठरणार नसून, साईबाबांचा आशीर्वाद आणि जनतेचा विश्वास यावरच आपली निष्ठा आहे. तसेच, गेल्या चार दिवाळींपासून प्रलंबित असलेल्या नवीन विश्वस्त मंडळाची नियुक्ती लवकरात लवकर झाल्यास संस्थानच्या उर्वरित प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी शिर्डी शहराच्या विकासाचा पट मांडताना डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने शहरात सुमारे ५० कोटी रुपयांची कामे सुरू असून साईबाबा संस्थानच्या माध्यमातून ३० कोटी रुपयांच्या थीम पार्कला मंजुरी मिळाली आहे. याशिवाय स्टेडियम, नाट्यगृह आणि इतर नागरी सुविधा उभारून पुढील वर्षभरात शिर्डी शहराचे चित्र बदललेले दिसेल. नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी शहरात स्वच्छता, अतिक्रमणांवर नियंत्रण आणि गुन्हेगारीमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी जबाबदारीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर, शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात, उद्योजक भाऊसाहेब चौधरी, साई निर्माण ग्रुपचे विजयराव कोते,

विठ्ठलराव पवार यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, संस्थानचे कर्मचारी आणि सोसायटीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जाहीर नोटीस

तमांम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत हि विद्यमान मालक १) श्री. अविनाश हरिभाऊ मेहेर, २) श्री. निलेश हरिभाऊ मेहेर, सर्व रा. कौठा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर यांचे मालकी हक्क कब्जे वाहिवाटीची मिळकत आहे. वरील विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायमखुश खरेदी हस्तांतर करून देण्याचे ठरविलेले असून त्या प्रमाणे व्यवहारही नक्की झालेला असून विसारपोटी अन्वये रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कोणतीही तक्रार अगर हरकत, गहान, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकुम, करार, वहिवाट, बोजा, कर्ज अथवा इतर कोणताही हक्क, हितसंबंध अथवा अधिकार असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी अन्यथा आमचे अशील कायमखुश खरेदी करून सदर मिळकत हस्तांतर व्यवहार पूर्ण करतील मग कुणाचीही तक्रार चालणार नाही मुद्दामहून कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्धीस दिली आहे.

**परिशिष्ट-मिळकतीचे वर्णनः-**

१) जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी तालुका नेवासा पैकी मौजे कौठा येथील गट नं. २७/२ क्षेत्र ०० हे ८७ आर संपूर्ण क्षेत्र हे विद्यमान मालक अविनाश हरिभाऊ मेहेर व निलेश हरिभाऊ मेहेर यांचे मालकीचे असून त्याचा आकार ०२.८० पै.

२) तसेच जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी तालुका नेवासा पैकी मौजे कौठा येथील गट नं. ३०/२/ब क्षेत्र ०० हे ८७ आर + पो. ख. ०.१३ असून त्याचा आकार १ रु. ४३ पै. हे संपूर्ण क्षेत्र विद्यमान मालक अविनाश हरिभाऊ मेहेर यांचे मालकीचे आहे.

३) तसेच जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी तालुका नेवासा पैकी मौजे कौठा येथील गट नं. ३०/२/ब क्षेत्र ०० हे ५९ आर असून त्याचा आकार ० रु. ९७ पै. हे संपूर्ण क्षेत्र विद्यमान निलेश हरिभाऊ मेहेर यांचे मालकीचे आहे.

हि संपूर्ण मिळकत येणे प्रमाणे शेतजमीन मिळकत या मध्ये असलेले जल, तृण, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप व तदंगभूत वास्तुसाहित काहीएक राखून न ठेवीता जाण्यायेण्याच्या हक्कासाहित, पूर्वापार वाहिवाटीच्या हक्काने दरोबस्त.

तारीखः- २६/१०/२०२६
शेवगाव

शिक्का

**सही**
**ॲड. अजय अशोक मोहिते**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय शेवगाव**
**मो.नं. ९७३०१६६२९७, ७५१७५७६७५६**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय, तालुका- पारनेर, जि. अहिल्यानगर**

क्र. कावि/अभिलेख/२७८/२०२४ — पारनेर दिनांक. १८/०९/२०२६

## जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर यांचे न्यायालय
अर्जदार-गोरक्ष चिमाजी ढवण रा.-निघोज, ता. पारनेर जि. अहिल्यानगर
विरुध्द-ग्रामपंचायत कार्यालय निघोज, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

विषय- जन्म-मृत्यु नोंद सुधारणा अधिनियम, २०२३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत. ज्याअर्थी, अर्जदार- गोरक्ष चिमाजी ढवण रा.निघोज ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांनी त्यांच्या सासरेच्या मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकांनी त्यांच्या मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. त्यांच्या मृत्यूची तारीख खालीप्रमाणे आहे.

अ.क्र.-१, नाव-दादाभाऊ विठोबा लाळगे, अर्जदाराशी नाते-सासरे, मृत्यु दिनांक-२४/०४/२०२१

निबंधकांनी दिलेल्या जन्म/मृत्यु नोंदीच्या अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०९ / २०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

शिक्का

**सही**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडधिकारी पारनेर**

## पान १ वरुन

### महागाईच्या विळख्यात जग

जगभरात जीवनखर्चाचा प्रश्न गंभीर- महागाईचा परिणाम केवळ अन्नधान्याच्या किमतींपुरता मर्यादित राहत नाही. घरभाडे, वीजबिले, इंधन, आरोग्यसेवा, शिक्षण आणि वाहतूक यांसारख्या खर्चात वाढ झाल्यास कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडते. उत्पन्नातील वाढ खर्चाच्या तुलनेत कमी राहिल्यास बचतीवर परिणाम होतो. अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागवितानाही काटकसर करावी लागते. त्यामुळे जीवनमान टिकवून ठेवणे हा विविध देशांतील नागरिकांसाठी महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. भारतातही सर्वसामान्यांसमोर आर्थिक आव्हाने भारतातही अन्नधान्य, भाजीपाला, इंधन, घरभाडे आणि शिक्षणाचा खर्च हा सर्वसामान्यांच्या अर्थकारणातील महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण भागात शेतीचा उत्पादनखर्च, खते, बियाणे आणि मजुरीचे दर यांचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. शहरी भागात घरभाडे, प्रवास, शिक्षण आणि आरोग्यावरील खर्चामुळे नोकरदार तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांच्या अर्थसंकल्पावर ताण पडतो. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना वाढत्या खर्चाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक खर्चात कपात करावी लागण्याची शयता असते. महागाई नियंत्रणात ठेवणे, रोजगाराच्या संधी वाढविणे, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य मोबदला मिळवून देणे आणि सामान्य नागरिकांची क्रयशक्ती टिकविणे ही सरकारांसमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर लक्ष ठेवण्याबरोबरच उत्पन्नवाढीच्या संधी उपलब्ध करून देणेही आवश्यक ठरते. युरोपातील आंदोलनांमधून आर्थिक प्रश्नांचे सामाजिक आणि राजकीय परिणाम किती व्यापक असू शकतात, हे स्पष्ट होते. भारतातील परिस्थिती आणि युरोपातील परिस्थिती यांत फरक असला, तरी वाढता जीवनखर्च हा दोन्हीकडे चर्चेचा महत्त्वाचा विषय आहे. नागरिकांना परवडणाऱ्या दरात मूलभूत सुविधा आणि जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देणे, तसेच उत्पन्न आणि खर्च यांच्यातील तफावत कमी करणे, हे अनेक देशांसमोरील महत्त्वाचे आव्हान बनले आहे.

### ४५०० ची पहिली उचल जाहीर करा

नेतृत्वाखाली निघालेल्या मोटारसायकल रॅलीतून ऊसदराच्या प्रश्नाकडे सरकार आणि साखर कारखानदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. उसाला योग्य दर मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळणार नाही, अशी भूमिका संघटनेने मांडली. कारखानदारांनी ऊसदराची भूमिका स्पष्ट करावी आणि पहिली उचल जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली. ऊसदर जाहीर झाल्याशिवाय गळीत हंगाम नाही उसाला प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल जाहीर केल्याशिवाय साखर कारखाने सुरू करू देणार नाही, असा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे. त्यामुळे आगामी काळात ऊसदराच्या प्रश्नावर आंदोलन अधिक तीव्र होण्याची शयता आहे. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरळीत सुरू होण्यासाठी ऊस उत्पादक शेतकरी आणि कारखानदार यांच्यात दराबाबत तोडगा निघणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, ऊसदराच्या प्रश्नावर शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा देण्याचे आवाहन संघटनेकडून करण्यात येत आहे. पहिली उचल किती जाहीर होते आणि कारखानदार संघटनेच्या मागणीला कसा प्रतिसाद देतात, याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. आगामी गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्यातील ऊसदर आंदोलनाला त्यामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### टोरेंट पॉवरचा प्रकल्प पर्यावरणपूरक कसा?

आदित्य ठाकरे यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रश्नांसाठी ६ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी ४२६ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला; मात्र प्रत्यक्षात कामांना सुरुवात झालेली नाही, असा दावा त्यांनी केला. केवळ निधी जाहीर करून प्रश्न सुटणार नाहीत, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

हिंजवडी मेट्रो प्रकल्पाच्या विलंबावरूनही त्यांनी सरकारला लक्ष्य केले. जुलैपासून मेट्रो सुरू होण्याबाबत वेगवेगळ्या तारखा सांगितल्या जात असून, आता नोव्हेंबरची तारीख ऐकायला मिळत आहे. मात्र, मेट्रो सुरू होण्याचे नाव घेत नाही, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांचे एखाद्या विषयाकडे विशेष लक्ष आहे, असे सांगितले जाते; पण प्रत्यक्षात ते दुर्लक्षच आहे का, असा सवाल त्यांनी केला. 'तुमचे नाव अदानी असते, तर एका रात्रीत प्रश्न मिटले असते,' असा टोलाही आदित्य ठाकरे यांनी लगावला. कर्जत-भीमाशंकर परिसरातील जंगलतोड, पर्यावरणाचा ऱ्हास आणि विकासकामांच्या अंमलबजावणीचा मुद्दा उपस्थित करत आदित्य ठाकरे यांनी सरकारच्या धोरणांवर टीका केली. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांच्या वक्तव्यातून पुढे आली आहे.

### एका बाजूला दुष्काळाच्या झळा, दुसरीकडे अधिवेशनावर १२९ कोटींचा खर्च!

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या तयारीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचा खर्च १२९ कोटी रुपयांवर पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. अधिवेशनाच्या तयारीसाठी नव्याने ४२ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चाला मंजुरी देण्यात आल्याने सार्वजनिक पैशांच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित होण्याची शयता आहे. दुष्काळाचा फटका बसलेल्या भागांत नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे आणि शेतीचे नुकसान कमी करण्यासाठी उपाययोजना करणे, ही प्रशासनासमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. अनेक कुटुंबांना पाणी, शेती आणि रोजीरोटीच्या प्रश्नांशी सामना करावा लागत असताना सरकारी खर्चाचे प्राधान्यक्रम काय असावेत, याबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे. खर्चकपातीनंतर पुन्हा वाढ मिळालेल्या माहितीनुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑगस्ट महिन्यात हिवाळी अधिवेशनाच्या तयारीसाठी १४५ कोटी रुपयांचा प्राथमिक अंदाज तयार केला होता. मात्र, राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि विविध विभागांना देण्यात आलेल्या खर्चकपातीच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर हा अंदाज कमी करून ८७ कोटी रुपयांपर्यंत आणण्यात आला. त्यानंतर आवश्यक अतिरिक्त कामांसाठी आणखी ४२ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे अधिवेशनाच्या तयारीसाठीचा सुधारित खर्च आता १२९ कोटी रुपयांवर पोहोचला आहे अधिवेशनाच्या आयोजनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, इमारतींची दुरुस्ती, तात्पुरती बांधकामे आणि अन्य सोयीसुविधांची कामे करावी लागतात. त्यामुळे काही अतिरिक्त खर्च अपरिहार्य असू शकतो. मात्र, या कामांची नेमकी गरज काय आहे, अतिरिक्त खर्च कशासाठी केला जाणार आहे आणि त्यातून कोणत्या सुविधा उपलब्ध होणार आहेत, याची स्पष्ट माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांनाही तेवढेच महत्त्व विधिमंडळाचे अधिवेशन हे राज्याच्या प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. त्यामुळे त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असले, तरी त्याचवेळी दुष्काळग्रस्त नागरिकांच्या मूलभूत गरजांकडेही पुरेसे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते. पाणीटंचाईग्रस्त गावांना दिलासा, जनावरांसाठी चारा, शेतकऱ्यांना मदत आणि रोजगाराच्या संधी यांसाठीच्या उपाययोजनांना पुरेसा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. अधिवेशनाच्या तयारीवरील खर्च आणि दुष्काळ निवारणासाठीच्या खर्चाची थेट तुलना करणे योग्य ठरणार नाही; कारण दोन्हींचे उद्देश वेगवेगळे आहेत. मात्र, सार्वजनिक निधी खर्च करताना पारदर्शकता, काटकसर आणि जनहिताला प्राधान्य देण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे अतिरिक्त ४२ कोटी रुपयांचा खर्च कोणत्या कामांसाठी मंजूर झाला, याचा तपशील समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे. एका बाजूला दुष्काळाशी झुंजणारी जनता आणि दुसरीकडे अधिवेशनाच्या तयारीसाठी वाढलेला खर्च, या पार्श्वभूमीवर सरकारच्या खर्चविषयक निर्णयांकडे आता लक्ष लागले आहे.

# एसएमबीटी हॉस्पिटलचा स्तुत्य उपक्रम; दोन वर्षांत १८ हजार मोफत सोनोग्राफी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने मोफत प्रसूती आणि सोनोग्राफीचा उपक्रम राबविण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षांत या उपक्रमांतर्गत १८ हजारांहून अधिक सोनोग्राफी तपासण्या, तर दोन हजारांहून अधिक महिलांच्या प्रसूती मोफत करण्यात आल्या आहेत. तसेच गर्भवती महिलांसाठी २४ डोहाळे जेवण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात नैसर्गिक प्रसूती तसेच शस्त्रक्रियेद्वारे होणारी प्रसूती मोफत केली जाते. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत आवश्यक असलेल्या चार सोनोग्राफी तपासण्याही मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. आतापर्यंत पाच हजारांहून अधिक गर्भवती महिलांनी प्रसूतीपूर्व आरोग्यसेवेचा लाभ घेतला आहे. महिलांना मानसिक आधार मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि गर्भावस्थेत घ्यावयाच्या काळजीची माहिती मिळावी, यासाठी डोहाळे जेवण कार्यक्रम आयोजित केले जातात. यासोबतच सकस आहार, नियमित व्यायाम, गर्भसंस्कार, रक्ताल्पता प्रतिबंध, उच्च जोखमीची गर्भधारणा आणि बालकाच्या विकासाबाबत मार्गदर्शन केले जाते. अकाली जन्मलेल्या बालकांची काळजी, नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभागातील सुविधा, बालशस्त्रक्रिया आणि लसीकरणाबाबतही जनजागृती केली जाते. आर्थिकदृष्ट्या गरजू महिलांना प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीदरम्यान आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळत आहे.

### ० ते १६ वर्षांच्या बालकांवर मोफत उपचार

मातांच्या मोफत प्रसूतीसोबतच त्यांच्या बालकांच्या आरोग्यालाही आम्ही तितकेच प्राधान्य दिले आहे. जन्मापासून ते सोळा वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींवर होणारे सर्व प्रकारचे उपचार, संसर्गजन्य आजारांवरील औषधोपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा एसएमबीटीमध्ये पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत. कुपोषणमुक्तीपासून ते लहान मुलांच्या विविध आजारांवर अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने आणि तज्ज्ञ बालरोगतज्ज्ञांमार्फत उपचार केले जातात. बालकांचे आरोग्य निरोगी आणि सुरक्षित ठेवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.

**-सचिन बोरसे,**
**संचालक, आरोग्यसेवा, एसएमबीटी हॉस्पिटल**



एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आयोजित डोहाळे जेवण कार्यक्रमात सहभागी महिला आणि नातेवाईक

# बिबट्याचा बछडा विहिरीत पडल्याने परिसरात खळबळ

## दिड तासाच्या अथक प्रयत्नानंतर बछड्याला वाचवण्यात यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील राशिनकर वस्ती जवळील विहिरीत रात्रीच्या वेळेस भक्षाच्या शोधात निघालेले बिबट्याचे एक बछडे दहा परस ( ७५ फुट ) विहिरीत पडले दिड तासाच्या अथक प्रयत्नाने बछड्याला वाचवण्यात यश आले.



याबाबत सविस्तर वृत्त असे की बाबासाहेब पुरुषोत्तम राशिनकर व जनार्धन पुरुषोत्तम राशिनकर यांच्या गट नंबर २८९ मधील विहिरीत रात्री भक्षाच्या शोधात निघालेले बिबट्याचा बछडा अंदाजे सहा महिने वयाचा दहा परस खोल विहिरीत पडला त्या विहिरीमध्ये अंदाजे दहा ते पंधरा फूट पाणी होते त्यामुळे तो बछडा वाचला बाबासाहेब राशिनकर हे दुपारी बारा वाजता आपल्या वस्तीपासून २०० फूट ही विहीर आहे लाईट आली म्हणून मोटर चालू करण्यासाठी ते गेले असता त्यांना विहिरीमध्ये ओरडल्याचा आवाज आला ते विहिरीमध्ये डोकावले असता त्यांना एक बिबट्या पडलेला दिसला त्यांनी तातडीने परिसरातील नागरिकांना याची माहिती दिली व याबाबत वनाधिकाऱ्याला माहिती दिली व तातडीने त्या ठिकाणी वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी दाखल झाले त्यांनी त्या ठिकाणी पिंजरा आणला व त्या विहिरीत पिंजऱ्याला दावे बांधून पिंजरा विहिरीत सोडला व आलगत त्या बिबट्याच्या बछड्याला पिंजऱ्याच्या साह्याने वर काढले त्या नंतर हा पिंजरा घेऊन अहिल्या नगर येथे हे अधिकारी गेले

या ठिकाणी परिसरातील नागरिकांनी बिबट्याचा बछडा पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती .या परिसरामध्ये बिबट्याची मादी व त्याचे अजून एखादे बछडे असण्याची शक्यता शेतकऱ्यांनी बोलताना व्यक्त केली. त्यामुळे त्यालाही लवकरात लवकर जेरबंद करावे अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी या वेळी केली.

या कामी नेवासा येथील वनपालन व्ही. एम.गाढवे, वनरक्षक राहुल शिसोदे, तसेच पाथर्डी येथील वनरक्षक एकनाथ खेडकर, वनपालअशोक सरमाळे, वन कर्मचारी एस.आर. मोरे, वाहन चालक गणेश पाखरे यांनी परिसरातील शेतकऱ्यांच्या सहकार्याने विशेष परिश्रम घेतले व बछड्याला विहिरीतून वर काढून नगर येथे घेऊन गेले.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित होणार : नगराध्यक्ष पराग संधान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन कोपरगावचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नगरपरिषद निवडणुकीदरम्यान पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करून नागरिकांना हक्काचे उतारे देण्याची ग्वाही दिली होती. या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने आता पावले उचलण्यात येत आहेत. यासंदर्भात १९ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्ष पराग संधान, मुख्याधिकारी अजित निकत, संतोष भट्टड व नगरसेवकांच्या उपस्थितीत बैठक झाली. यामध्ये १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेली पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. अर्जासोबत आधारकार्ड किंवा पॅनकार्ड, अतिक्रमण जुन्या तारखेपासून अस्तित्वात असल्याचा पुरावा, मतदार यादीतील नावाची प्रत, वीजबिल, उपलब्ध असल्यास मालमत्ता कराची पावती आणि विहित नमुन्यातील शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. एका कुटुंबाला संपूर्ण महाराष्ट्रात केवळ एकच अतिक्रमण नियमित करता येईल. नियमित केलेल्या जागेची पाच वर्षे विक्री, भाडेपट्टा, हस्तांतरण किंवा वापरबदल करता येणार नाही. अंतिम निर्णय शासनाच्या नियमांनुसार घेतला जाणार असून, पात्र नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन संधान व मुख्याधिकारी अजित निकत यांनी केले.

# सह्याद्रीचे अश्रू पुसणार कोण?

## विकासाच्या वादळात निसर्गाची घुसमट;



महाराष्ट्राच्या पश्चिम सीमेवर भक्कमपणे उभा असलेला सह्याद्री आज जणू मूकपणे आक्रोश करीत आहे. हिरवीगार जंगले, उंचच उंच डोंगर, खळखळणारे झरे, फेसाळणारे धबधबे आणि असंख्य वन्यजीवांनी समृद्ध असलेली ही पर्वतरांग निसर्गाचे वरदान आहे. मात्र, डोंगरफोड, वृक्षतोड, खाणकाम, अनियंत्रित बांधकामे, वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल यांसारख्या आव्हानांमुळे या अमूल्य नैसर्गिक वारशासमोर गंभीर प्रश्न उभे ठाकले आहेत. अशा परिस्थितीत एकच प्रश्न मनाला अस्वस्थ करतोसह्याद्रीचे अश्रू पुसणार कोण? विकासाच्या नावाखाली रस्ते रुंदीकरण, बोगदे, मोठे बांधकाम प्रकल्प आणि खाणकाम यांसाठी अनेक डोंगराळ भागांत जमिनीच्या नैसर्गिक रचनेत बदल होत आहेत. या कामांचा परिणाम प्रत्येक ठिकाणी सारखा नसला, तरी पर्यावरणीय परिणामांचा योग्य अभ्यास न करता होणारी कामे निसर्गासाठी धोकादायक ठरू शकतात. डोंगरांचे उतार अस्थिर होणे, मातीची धूप, पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात बदल आणि वन्यजीवांच्या अधिवासांचे तुकडे होणे, अशा समस्या निर्माण होण्याची शक्यता वाढते. विकास आवश्यक आहे; परंतु तो निसर्गाचा विनाश करून साधायचा की निसर्गाशी समतोल राखून, हा विचार करण्याची वेळ आली आहे.

पावसाळ्यात सह्याद्रीच्या काही भागांत दरडी कोसळणे, रस्ते खचणे आणि अचानक पूर येणे यांसारख्या घटना नागरिकांच्या सुरक्षिततेसमोर आव्हान निर्माण करतात. अतिवृष्टी, भूगर्भीय रचना, उतारांवरील हस्तक्षेप आणि अपुऱ्या पाणी निचरा व्यवस्थेमुळे काही ठिकाणी धोका अधिक वाढू शकतो. निसर्गाच्या रचनेत होणारे बदल आणि हवामानातील अनिश्चितता लक्षात घेऊन संवेदनशील भागांचे वैज्ञानिक सर्वेक्षण, भूस्खलनाचा पूर्वइशारा देणारी यंत्रणा आणि सुरक्षित बांधकाम पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे.

उत्तर दक्षिण पसरलेला सह्याद्री हा महाराष्ट्रातील पूर्व व पश्चिम वाहिनी असलेलया अनेक प्रमुख नद्यांचा उगम प्रदेश आहे. या नद्या शेती, संभाजीनगर, मुंबई, पुण्यासह अनेक महाराष्ट्रातील अनेक प्रमुख शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, मोठ मोठे शहरी उद्योग आणि ग्रामीण जीवनाला सुध्दा मोठा आधार देतात. मात्र, काही भागांत नदीपात्रांमधील कचरा, सांडपाणी, अनियंत्रित उत्खनन, जंगलतोड आणि नदीकाठावरील बांधकामे यांमुळे जलस्रोतांवर ताण वाढत आहे.

जंगलतोड आणि जमिनीच्या वापरातील बदलांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याच्या प्रक्रियेवरही परिणाम होऊ शकतो. पावसाळ्यात भरभरून वाहणारे झरे उन्हाळ्यात आटू लागले, तर त्याचा फटका गावकऱ्यांना, शेतकऱ्यांना आणि वन्यजीवांना बसतो. पाण्याचे संवर्धन करायचे असेल, तर केवळ धरणे बांधून चालणार नाही; सह्याद्री मधील जलस्रोतांचे उगमक्षेत्र, जंगलांचे आच्छादन आणि नैसर्गिक जलप्रवाह ही जपावे लागतील. महाबळेश्वर, माथेरान, आंबोली, लोणावळा, भंडारदरा, छत्रपतींचे गडकिल्ले आणि सह्याद्रीतील इतर निसर्गरम्य स्थळांकडे पर्यटकांचा ओघ वाढत आहे. पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगार तर मिळतोच ; मात्र अनियंत्रित गर्दी, प्लास्टिक कचरा, वाहनांचे प्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि नियमबाह्य बांधकामे यांमुळे पर्यावरणावर ताण निर्माण होऊ लागला आहे. पर्यटन बंद करणे हा उपाय नसून, पर्यटकांची वहन क्षमता लक्षात घेणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे, संवेदनशील भागांत नियम लागू करणे आणि स्थानिक समुदायांना शिक्षण, शेती, व्यवसाय व पर्यावरण पूरक पर्यटनातून लाभ मिळवून देणे, हा अधिक शाश्वत मार्ग आहे. सह्याद्रीच्या संरक्षणाची जबाबदारी केवळ शासनाची नाही आणि केवळ पर्यावरणप्रेमींचीही नाही. शासन, वनविभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग, बांधकाम व्यावसायिक, पर्यटक आणि नागरिक या सर्वांनी आपापली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. शासनाने पर्यावरणीय नियमांची कठोर अंमलबजावणी करून संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करावे. नागरिक व पर्यटकांनी प्लास्टिकचा वापर कमी करून स्वच्छता आणि निसर्गसंवर्धनाचे नियम पाळावेत. यासोबतच पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्यास तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था, सार्वजनिक माहिती आणि कृती आराखड्यांच्या नियमित तपासणीची गरज आहे. सह्याद्री म्हणजे केवळ डोंगरांची रांग नाही. तो महाराष्ट्राच्या इतिहासाचा साक्षीदार, नद्यांचा उगमदाता, जैवविविधतेचा खजिना आणि लाखो लोकांच्या जीवनाचा आधार आहे. आज सह्याद्री आपल्याला जणू विचारत आहे, मी तुम्हाला पाणी दिले, सावली दिली, निसर्गसंपत्ती दिली; मग माझ्या जखमांवर फुंकर घालणार कोण? या प्रश्नाचे उत्तर केवळ भाषणांतून मिळणार नाही. त्यासाठी वृक्षसंवर्धन, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, शास्त्रीय नियोजन, जबाबदार पर्यटन आणि पर्यावरणीय कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी यांसाठी प्रत्यक्ष कृती करावी लागेल. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वतरांग, कोकणचा समुद्रकिनारा, घनदाट जंगले, नद्या, धबधबे, जैवविविधता आणि पावसाची समृद्धी पाहिली, तर निसर्गसंपत्ती च्या दृष्टीने हा प्रदेश अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. दुसरीकडे, कोकण सारखीच जवळ जवळ निसर्ग संपदा असणारे तैवान, दक्षिण कोरिया देशांनी मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण, शहरीकरण, तंत्रज्ञान आणि निर्यातप्रधान अर्थव्यवस्था विकसित केल्या आहेत. तरीही त्यांच्या अनेक डोंगराळ भागांत जंगले, निसर्गरम्य किनारे आणि संरक्षित नैसर्गिक प्रदेश टिकून आहेत. मग महत्त्वाचा प्रश्न असा पडतो कि, औद्योगिक विकास करताना निसर्ग नष्ट होणे अपरिहार्य आहे का, की विकासाची पद्धत योग्य असेल तर उद्योग आणि निसर्ग एकत्र टिकू शकतात? याचे उत्तर केवळ भौगोलिक परिस्थितीत नाही. त्यामध्ये जमीन वापराचे नियोजन, वनसंवर्धन, उद्योगांचे स्थान, पायाभूत सुविधांची गुणवत्ता, कायद्यांची अंमलबजावणी आणि स्थानिक समाजाचा सहभाग या सर्वांचा मोठा वाटा आहे. सह्याद्रीचे अश्रू पुसण्यासाठी एखाद्या एका तारणहाराची वाट पाहण्यापेक्षा आपण प्रत्येकाने आपल्या वाट्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कारण सह्याद्री वाचविणे म्हणजे निसर्ग वाचविणे; आणि निसर्ग वाचविणे म्हणजे आपल्या अस्तित्वाचे भविष्य जपणे!

डोंगरांचे मौन, नद्यांची घुसमट आणि जंगलांची वेदना आपण आज ऐकली नाही, तर उद्या निसर्गाचा इशारा संकटाच्या रूपाने आपल्यासमोर उभा राहील.



**लेखक**
**भिला सोनू पाटील**
**(जल अभ्यासक)**
**जल प्रहरी सन्मान विजेता,**
**जल शक्ती मंत्रालय,**
**भारत सरकार**

# टोळीप्रमुख भोसले, बोकड्या काळेसह ११ जणांवर मोक्का

## पान १ वरुन

देवा पावल्याकैलास काळे,वय ३५ वर्षे, रा. कडुस(पाडळी रांजणगाव), ता. पारनेर हल्लीरा. सुंदर सृष्टी, शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे, तुषार सावत्या भोसले, रा.पारनेर, अविनाश सावत्या भोसले,रा. पारनेर, सुशांत सुरेश भोसले, रा.पारनेर, अनिल सुरेश भोसले,रा. सदर, आवेश निरप्या भोसले, रा.पारनेर लोंढया निरप्या भोसले, रा. पारनेर लोंढया निरप्या भोसले, रा. पारनेर, प्रशांत उर्फ प्रविण सुरेश भोसले, वय २७ वर्षे, रा.पारनेर राम उर्फ बोकडया उर्फ बन्या लखण काळे, रा. पारनेर शरद कैलास काळे,वय ४२वर्षे, रा. कडुस पाडळी, ता. पारनेर यांनी एक गुन्हेगारी टोळी तयार करुन त्यांचे टोळीचे गुन्हेगारी अस्तित्वटिकविण्यासाठी जिल्हयातील एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन,नगर तालुका पोलीस स्टेशन, सुपा पोलीस स्टेशन, नगर तालुका पोलीस स्टेशन, बेलवंडी पोलीस स्टेशन, श्रीगोंदा पोलीस स्टेशन,तर पुणे जिल्हयातील शिरुर पोलीस स्टेशनला एकत्र येवून संघटीत टोळी तयार करुन आर्थिक फायदा मिळविण्याकरीता बळाचा वापर करुन तो टोळीतील साथीदारासोबत दरोडा टाकणे, जबरी चोरी करणे, घरफोडी चोरी करणे,दरोडयाच्या तयारीत मिळुन येणे, गैर कायदयाची मंडळी जमवुन घातक हत्यारासह खुनाचा प्रयत्न करणे, गैर कायदयाची मंडळी जमवुन शासकीय कर्मचारी यांना त्यांचह शासकीय कामात अडथळा निर्माण करुन खुनाचा प्रयत्न करणे,अल्पवयीन मुलीस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे, चोरी करणे अशाप्रकारचे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुपा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी गुन्हा क्रमांक २४८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१० (२) अंतर्गत दाखल गुन्ह्यात मोक्का कायद्याची वाढीव कलमे लागू करण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर केला होता. नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास शिरीष बामणे, उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर ग्रामीण विभाग करीत आहेत. संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईकडे महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे .

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि. २६ ऑक्टोबर २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १५६ २४६ ६६० | २-९ | १२६ ४५९ ९०० | २५-७९-४८-३०-९६ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-६ | १२३ १५० १२४ | ५१-२६-७८-३३-६४ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १२५ ४६८ ८०० | ८-१ | १२८ १४६ १०० | ८०-३१-२५-६४-१९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |
| 21/09/2026 to 25/09/2026 | 390 25 348 | 457 62 129 | 480 23 599 | 166 30 479 | 150 60 280 |
| 28/09/2026 to 02/10/2026 | 669 19 135 | 137 18 279 | 260 84 257 | 660 29 126 | 369 84 770 |
| 05/10/2026 to 09/10/2026 | 140 57 250 | 459 85 168 | 130 48 567 | 469 99 126 | 558 84 590 |
| 12/10/2026 to 16/10/2026 | 160 79 568 | 290 11 669 | 122 58 189 | 130 46 123 | 257 42 480 |

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
|---|---|
| २२० ४२ ६८८ | सुट्टी |

# मोहटादेवी देवस्थानात शारदीय नवरात्र उत्सवाची सांगता



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शालेय नवरात्र उत्सवाची सांगता म्हणजे कोजागिरी पौर्णिमेला राज्याच्या विविध भागातून आलेल्या सुमारे तीन लाख भाविकांनी मोहटा देवीचे दर्शन घेतले. पहाट पासूनच भाविकांची गर्दी सुरू झाली.सुमारे लाखभर महिला भाविकांना सुवासिनींचे पुरणपोळीचे भोजन शिवसेने भोजन म्हणून महिला भाविकांकडूनच देण्यात आले. सुमारे पाच क्विंटल पुरणपोळ्याचा प्रसाद नैवेद्य स्वरूपात आला तो भाविकांना देवस्थान समितीतर्फे वाटण्यात आला. शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता कोजागिरी पौर्णिमेला होता असताना ज्या भाविकाला नवरात्र उत्सव कालावधीमध्ये देवी दर्शनासाठी यायला जमले नाही, ते भाविक कोजागिरी पौर्णिमेला श्रद्धायुक्त अंतकरणाने येऊन देवीपुढे नतमस्तक होतात. पौर्णिमेच्या दिवशी देवीला लक्ष्मी स्वरूप मानले जात असल्याने तिचे दर्शन महाकल्याणकारी व पुण्यप्रद समजले जाते. उन्हाळ्यासारखे रखरखते ऊन असूनही देवस्थान समितीने यंदा भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून नव्यानेच बांधण्यात आलेल्या घाट रस्त्यातून भव्य अशा पार्किंग पर्यंत वाहनांचे नियोजन केल्याने भाविकांना फारसा त्रास झाला नाही. अगदी देवी मंदिरापुढे जाऊन वाहन थांबत असल्याने दुपारच्या वेळी सुद्धा तेवढीच गर्दी होती.

# दोन वर्षांतच रस्त्याची चाळण!

## शेडगाव-टाकळी रस्त्याच्या कामावर प्रश्नचिन्ह‘रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ता?’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा : तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था आता तालुक्याच्या विकासाचे वास्तव सांगू लागली आहे. शेडगाव ते टाकळी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या रस्त्याची इतक्या कमी कालावधीत दुरवस्था कशी झाली, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**

रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे पाहता ‘रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ता?’ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, अपघाताचा धोकाही वाढला आहे. रस्त्याच्या कामासाठी निधी खर्च होऊनही नागरिकांच्या वाट्याला खड्डेच येत असतील, तर या कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.रस्ता दोन वर्षांत उखडत असेल, तर प्रश्न केवळ खड्ड्यांचा नाही; तर सार्वजनिक निधीच्या वापराचा आणि कामाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणेच्या जबाबदारीचाही आहे.

संबंधित रस्त्याचे काम नेमके कोणत्या ठेकेदाराने केले, कामासाठी किती निधी खर्च झाला.

कामाचा दर्जा तपासण्यात आला होता का आणि दोषदायित्व कालावधी लागू



आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. रस्त्याच्या कामातील तांत्रिक त्रुटी, निकृष्ट दर्जाचे साहित्य किंवा कामाच्या अंमलबजावणीतील अनियमितता यांची शक्यता तपासून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याची गरज आहे.

रस्त्याच्या कामात दोष आढळल्यास संबंधित ठेकेदारावर नियमानुसार कठोर कारवाई करावी

तसेच आवश्यक निकष पूर्ण होत असल्यास त्याला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी नागरिक आणि या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांकडून होत आहे.

केवळ खड्डे बुजवून तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, रस्त्याच्या दुरवस्थेमागे काहीतरी ‘गोडबंगाल’ असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. मात्र, या चर्चेला अधिकृत दुजोरा मिळालेला नसून, प्रत्यक्ष चौकशीअंतीच सत्य स्पष्ट होणार आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून रस्त्याच्या कामाचा दर्जा, खर्च आणि जबाबदार यंत्रणेची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# कांदा उत्पादन शेतकरी संभ्रमात

**निघोज :** पारनेर तालुक्यातील कुकडी डावा कालवा व कुकडी नदीच्या लाभधारक शेतकऱ्यांमध्ये सध्या कोनती पिके घ्यावीत याविषयी संभ्रम निर्माण झाला असून दुष्काळाचे चटके बागायत परिसराला बसण्यास सुरुवात झाली असून हे दिवस कुठे नेणार आहेत याविषयी जनतेत भिती व्यक्त करण्यात येत आहे. पारनेर तालुक्यातील १७ ते १८ गावांना कुकडी डावा कालवा व कुकडी नदीचे पाणी गेली अनेक वर्षांपासून मिळत आहेत. या लाभधारक भागात साधारण कांदा हे नगदी पिक घेऊन शेतकरी आर्थिक अवस्थेत बऱ्यापैकी संपन्न होण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र गेली तीन ते चार वर्षे कांद्याला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यावर्षी संपूर्ण राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारचे पाण्यावर कडक निर्बंध आहेत. पाण्याचे रब्बी हंगामातील रोटेशन कधी सुटणार याची शेतकरी वाट पाहात आहे.

द•ख•ल



## अहमदनगर जिल्हा महिला विकास मंडळातर्फे मोफत शिवण वर्गाचा प्रारंभ

**अहिल्यानगर :** समाजभूषण स्व. श्रीमती रईसा शेख यांनी स्थापन केलेल्या अहमदनगर जिल्हा महिला विकास मंडळाच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने दातांच्या दवाखान्याशेजारी, शतरंजी मस्जिद रोड, हातिमपुरा, धरती चौक, अहिल्यानगर येथे मोफत बेसिक शिवण वर्ग सुरू करण्यात आला. ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या शुभहस्ते या वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी महापौर सुरेखाताई कदम, मंगलाताई लोखंडे, नगरसेवक दत्तात्रय कावरे, फरीदा फारूक आणि सीमा असलम यांची प्रमुख उपस्थिती होती. महिलांना शिवणकामाचे मूलभूत प्रशिक्षण मिळावे, त्यांच्यात कौशल्य विकसित व्हावे आणि या कौशल्याच्या माध्यमातून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम हाती घेतला आहे. आजच्या काळात महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता स्वतःच्या कौशल्याच्या बळावर आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा हेतू आहे. शिवणकामासारखे कौशल्य आत्मसात केल्यास महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नातही हातभार लावता येऊ शकतो. त्यामुळे हा मोफत शिवण वर्ग महिलांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

## सचिन जगताप यांच्या निवडीबद्दल मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेतर्फे सत्कार



**अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, सतीश ताठे, विकास गीते, अजय कांबळे, विजय कोतकर यांच्यासह पतसंस्थेचे संचालक मंडळ उपस्थित होते. सचिन जगताप यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया ते नेत्रदान जनजागृतीच्या कार्याची दखल

**अहिल्यानगर :** दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी गेल्या ३४ वर्षांपासून अखंडपणे नेत्रसेवेचे कार्य करणारे जालिंदर बोरुडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल ‘कार्य गौरव सन्मान’ प्रदान करून गौरविण्यात आले. दिव्य दृष्टी फाउंडेशन आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सन्मान सोहळ्यात ब्रिगेडिअर राजीव चावला आणि उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बोरुडे यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

# सुजित झावरे यांनी विकासकामांचा डोंगर उभा केला : शिंदे

## काकणेवाडीत विकासकामांचे लोकार्पण व शुभारंभ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर :** सुजित झावरे पा. यांनी विकासकामांचा डोंगर उभा केला असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी केले.

काकणेवाडी येथे सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या विविध योजना व विकासकामांचा लोकार्पण आणि शुभारंभ सोहळा पार पडला.यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की राजकारणात अनेक जण येतात, काम करतात आणि आपली छाप सोडतात. अनेकांना आमदार, खासदार, मंत्रिपद किंवा शासकीय महामंडळांच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळते. अशा पदांमुळे मतदारसंघ, वाड्यावस्त्या आणि ग्रामीण भागाचा विकास करणे सोपे जाते. मात्र कोणतेही मोठे पद नसताना वर्षाचे ३६५ दिवस लोकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी



झटणे आणि गावांचा विकास साधणे सोपे नसते. तरीही सुजित पाटील झावरे यांनी गेली दोन दशके पारनेर तालुक्यात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे.

सुमारे दीड वर्षापूर्वी पारनेर येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुजित पाटील झावरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर तालुक्यात विकासकामांना मोठी गती मिळाल्याचे शिंदे यांनी नमूद केले. पारनेर शहराचा अनेक वर्षे रखडलेला डीपीआरचा प्रश्न मार्गी लावणे आणि शहरात सुमारे सहा कोटी रुपयांची कामे करणे, ही याची ठळक उदाहरणे आहेत.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते श्री. खंडू भुखन, महिला आघाडी अध्यक्षा सौ. कोमलताई भंडारी आणि युवा नेते श्री. अमोल साळवे,राहुल वाळुंज, सरपंच अशोक वाळुंज, पोपट वाळुंज आणि रंगनाथ महाराज वाळुंज यांनी आपले मनोगत व्यक्त करत गावात झालेल्या विकासकामांबद्दल आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विजय वाळुंज सर यांनी केले, तर सोहळ्याच्या शेवटी उपसरपंच श्री. भगवान वाळुंज यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास सुरेशशेठ पठारे, शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष श्र संदीप कपाळे,बी.एल.ठुबे, तालुका अध्यक्ष अरुणराव ठाणगे,खंडु भुकन,महिला अध्यक्ष सौ. कोमलताई भंडारी,अमोल साळवे, राजेंद्र शेळके, राजेंद्र रोकडे, गजानन सोमवंशी,किसन धुमाळ, स्वप्निल रांहिज,प्रसाद झावरे, सोनू मंचरे ,शिवाजी ठाणगे, महेश ठाणगे, प्रतीक ठाणगे, रविंद्र पाडळकर, लहु जाधव, संकेत झावरे, कैलास नऱ्हे यांसह परिसरातील नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# बालकलाकारांच्या नृत्याविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नृत्यझंकार डान्स अकॅडमीच्या वतीने ‘नवरंग नवरात्री’ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक धार्मिक संस्कृती, भारतीय लोककला, स्त्रीशक्ती आणि आधुनिक सामाजिक संकल्पना यांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. तब्बल ६० बालकलाकारांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. देवीची विविध रूपे, कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व, श्रीकृष्णाची रासलीला, महाराष्ट्राची पारंपरिक लोककला आणि गुजरातच्या गरब्याचे देखणे सादरीकरण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सीमा ढवळे, भूषण भंडारी , डॉ. ओंकार कोकाटे, राजकुमार गुरुनानी, पालक प्रतिनिधी स्नेहल जामगावकर आणि नृत्यझंकारच्या संचालिका सौ. प्रिया ओगले-जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

कार्यक्रमात देवीच्या पूजनीय रूपांचे दर्शन घडविणाऱ्या नृत्यांसह कोजागिरी पौर्णिमेचे वैशिष्ट्य आणि श्रीकृष्णाच्या रासलीलेचे सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्राच्या पारंपरिक जोगवा आणि गोंधळ या लोककलाही बालकलाकारांनी प्रभावीपणे सादर केल्या. त्यांच्या सादरीकरणातून भक्ती, परंपरा आणि संस्कारांचे दर्शन घडले.

# लोकमंगल गृहनिर्माण प्रकरणात आता ‘सहकार’ कायद्याचा फास !

## प्रकाश कोटा आणि अशोक पुंड यांच्या अडचणी वाढणार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरमधील नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित नालेगांव, अहिल्यानगर या प्रकरणात आता सहकार विभागाने आक्रमक भूमिका घेतली आहे. सहकार विभागाकडे संस्थेची अधिकृत नोंदणी झालेली नसताना ‘सहकारी’ या शब्दाचा वापर करून जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार केल्याचा आणि नागरिकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १४५ च्या उल्लंघनासंदर्भातील वाढीव कलम दाखल करण्यासाठी सहकार विभागाने कोतवाली पोलिसांकडे कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यापूर्वीच कोतवाली पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल असताना आता सहकार कायद्याच्या तरतुदींचाही मुद्दा पुढे आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

या प्रकरणात नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक प्रकाश भुमय्या कोटा आणि प्रवर्तक अशोक बाळू पुंड यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सहकारी संस्था उपनिबंधक, अहिल्यानगर तालुका कार्यालयाने पोलिसांना दिलेल्या पत्रात संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक प्रस्ताव कार्यालयाकडे सादर करण्यात आला नसल्याचे नमूद केले आहे. असे असतानाही संस्थेच्या नावाने जमीन खरेदी केल्याचे, तसेच करारनामा आणि खरेदीपावती संदर्भातील कागदपत्रे तक्रारदाराने सादर केल्याचे कार्यालयाने स्पष्ट केले आहे. या व्यवहारांमध्ये ‘सहकारी’ या शब्दाचा बेकायदेशीर वापर करून लोकांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणाची सुरुवात बुरा लक्ष्मण नरसय्या यांनी दि.१२ नोव्हेंबर २०२४ रोजी केलेल्या तक्रार अर्जातून झाली. नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित या संस्थेच्या नोंदणीबाबत माहिती मागविण्यात आली असता, उपनिबंधक कार्यालयाच्या अभिलेख कक्षातील नोंदणी रजिस्टरमध्ये या संस्थेची नोंदणी झाल्याचे आढळून येत नसल्याचे दि.१४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रातून स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे संस्थेच्या नावाने करण्यात आलेल्या व्यवहारांच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित झाले.

त्या सोबत कैलास नामपेल्ली उषाकोयल यांनी ना.डॉ.पंकज राजेश भोयर यांना अर्ज करुन या संस्थेसंदर्भात माहिती दिली असता. सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे, नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करणे आणि नियोजित संस्थेच्या नावाने बँक खाते उघडण्यासंदर्भातील नियमांचे पालन करणे आवश्यक.

# १९६५ चा दाखला वडार समाजाला मान्य नाही : धोत्रे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शासनाने वडार समाजाचे दाखले देताना जे १९६५ चे कागदपत्र मागितले ते समाजाला मान्य नाही.आमच्या पदाधिकाऱ्यांनी जे सांगितले ते वडार आहेत,कारण आमच्याकडे शिक्षणाचे प्रमाण कमी होते.त्यामुळे १९६५ चा दाखला निघणे अवघड आहे असे प्रदीपादन वीर वडार एकता फाउंडेशनचे महासचिव ब्रह्मा भाऊ धोत्रे यांनी नगरमध्ये पदाधिकारी नियुक्ती पत्र वाटप कार्यक्रमात बोलताना केले,

यावेळी संपर्कप्रमुख रामू देवकर,जिल्हाध्यक्ष मारुती विटेकर,जिल्हा कार्याध्यक्ष सागर कुसमुडे,मराठी फिल्म अभिनेता राजेश ननवरे,कोअर कमिटीचे संदीप कुसळकर,उत्तर नगर जिल्हाध्यक्ष संपत गायकवाड,महाराष्ट्र उपाध्यक्ष नितीन दादा शेलार,पदाधिकारी गणेश कुसमुडे,नितीन कुसमुडे,अनिल बोठे आदी उपस्थित होते

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजय दादा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण नगर जिल्हा अध्यक्ष मारुती विटेकर यांनी आज नगर शहर व तालुका, कर्जत,श्रीगोंदा,पाथर्डी तालुक्यामधील पदाधिकाऱ्यांची नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले, होते यावेळी ते बोलत होते

प्रास्ताविक नितीन शेलार यांनी केले ते म्हणाले समाजाच्या मागण्यांसाठी नागपूरला राज्यस्तरीय अधिवेशन घेण्यात येणार असून समाजाचे महिला संघटना सुरू झाले असून महिला प्रगत झाली तर समाज आपला नक्कीच पुढे जाईल. संघटनेची पार्श्वभूमी मारुती विटेकर यांनी सांगितले समाजाने व्यसनापासून दूर राहून शिक्षण घेऊन आपली प्रगती करावी त्यासाठी संघटनेचे कायम सहकार्य राहील, सध्या युवक जागृत झाला असून तो समाज जागृतीचे काम करत आहे. यावेळी नियुक्ती झालेले पदाधिकारी पुढील प्रमाणे नगर तालुका प्रमुख श्रीकांत धोत्रे, उप तालुकाप्रमुख सागर मुदळ, नगर शहराध्यक्ष विलास धोत्रे, तालुका संघटक गौरव कुसळकर,कर्जत तालुका अध्यक्ष सतीश विटेकर,श्रीगोंदा तालुका अध्यक्ष मोहन अण्णा वेठेकर,नगर शहर उपप्रमुख राजेश शिंदे,सावेडी उपनगर अध्यक्ष राहुल फुलारे,उपाध्यक्ष आकाश कुर्हाडे,सरचिटणीस किरण वेताळ,खजिनदार गणेश कुसाळकर,उपाध्यक्ष विशाल गायकवाड,कार्यकारी सदस्य राहुल धोत्रे,गणेश कुसाळकर आदींना यावेळी नियुक्तीची पत्रे प्रमाणपत्र देण्यात आली.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासह रोजगाराभिमुख प्रशिक्षणावर भर : डॉ.पारस कोठारी

## दिवसा काम, रात्री शिक्षण; आता संगणक कौशल्यांचीही मिळणार जोड!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दिवसभर अर्थार्जनासाठी धावपळ, कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे आणि या सर्व आव्हानांवर मात करत रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देण्याचा उपक्रम भाई सथ्था नाईट हायस्कूल आणि मासूम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या तब्बल ५७ विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात संगणकाचे ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही गरज ओळखून मासूम संस्थेच्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संगणक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये टॅली, ऑफिस असिस्टंट, ग्राफिक डिझाइन, टॅली प्राइम विथ जीएसटी आणि संगणक टायपिंग आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करून रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी मदत होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी आणि आर्मी पब्लिक स्कूलमधील क्रीडा शिक्षक प्रमोद डोंगरे उपस्थित होते. रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

प्रमुख पाहुणे प्रमोद डोंगरे यांनी रात्र शाळेतील आपल्या अनुभवांना उजाळा दिला. ते म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षण घेत असताना क्रीडा क्षेत्रातून करिअर घडविण्यासाठी शाळेने मोठा आधार दिला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी जातानाही शाळेने खर्चाची जबाबदारी उचलून सहकार्य केले. रात्र शाळा केवळ शिक्षण देण्याचे काम करत नाही, तर विद्यार्थ्यांना जीवनात स्वतःच्या पायावर उभे करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते, असे त्यांनी नमूद केले. प्राचार्य सुनील सुसरे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले की, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मासूम संस्थेच्या माध्यमातून अतिरिक्त तास घेतले जातात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रशिक्षणही दिले जात आहे. या संधींचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थी समाजात स्वतःचे स्थान निर्माण करत आहेत.

विद्यार्थ्यांना शिक्षण, शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रात्र शाळा आणि मासूम संस्था एकत्रितपणे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांना प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारी कौशल्ये आत्मसात करता यावीत, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे



प्राचार्य सुसरे यांनी सांगितले. रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळा आणि मासूम संस्था विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. आधुनिक युगातील गरजा लक्षात घेऊन कौशल्याधारित शिक्षण देण्यावर संस्थेचा विशेष भर आहे.

गुणवत्तेच्या बाबतीत आणि विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने आपली संस्था राज्यात आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, की शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळालेल्या मदतीची जाणीव ठेवा. संस्थेने मोठ्या अपेक्षेने ही संधी उपलब्ध करून दिली आहे. त्या अपेक्षांचा भंग होऊ देऊ नका. मेहनत, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर आपले भविष्य उज्ज्वल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

## दखल

### लोणीकंद पोलिस ठाण्याच्या आवारात मारामारी; चौघांवर गुन्हा

**वाघोली :** परस्परविरोधी तक्रारी देण्यासाठी लोणीकंद पोलिस ठाण्यात आलेल्या दोन गटांत पोलिस ठाण्याच्या आवारातच मारामारी झाली. या घटनेत सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी (ता. २१) दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली.

याप्रकरणी विजय गायकवाड, गणेश गायकवाड, शुभम गायकवाड आणि राज सावंत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस हवालदार अजित कुन्हे यांनी फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोलवडी येथील दोन गटांतील व्यक्ती परस्परविरोधी तक्रारी देण्यासाठी लोणीकंद पोलिस ठाण्यात आल्या होत्या. त्यानुसार दोन्ही बाजूंविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करून संबंधितांना कायदेशीर नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर पोलिस ठाण्याच्या इमारतीबाहेर जात असताना दोन्ही गटांमध्ये आवारातच मारामारी सुरू झाली. यामुळे परिसरात गोंधळ निर्माण झाला. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून दोन्ही गटांतील व्यक्तींना एकमेकांपासून दूर केले. पोलिस ठाण्याच्या आवारातच मारामारी झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास लोणीकंद पोलिस करीत आहेत.

### प्रतीक कडलकची १९ वर्षाखालील राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड



**लोणी धामणी :** निरगुडसर (ता.आंबेगाव) येथील उदयोन्मुख क्रिकेटपटू प्रतिक ज्ञानेश्वर कडलक याची १९ वर्षाखालील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा क्रिकेट खेळासाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय निवड चाचणीमध्ये संपूर्ण राज्यातून १९ वर्षाखालील खेळाडू सहभागी झाले होते. त्यातून प्रतिकची निवड झाली आहे. दि.११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान मध्य प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिक हा महाराष्ट्र संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून खेळणार आहे.या अगोदर देखील प्रतिक याने वयोगट-१४ आणि वयोगट-१६ महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केलेले आहे.त्याच्या या निवडीबद्दल आमदार दिलीप वळसे पाटील यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. प्रतिक हा राजमाता ज्युनिअर कॉलेज, लांडेवाडी (भोसरी) येथील विद्यार्थी असून त्याच्या निवडीमुळे निरगुडसर व आंबेगाव तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. आहे. त्याच्या या निवडीमुळे आंबेगाव तालुक्यातील क्रिकेट प्रेमीनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

### निमोणे येथे हातभट्टीवर पोलिसांचा छापा

**कवठे येमाई :-** शिरूर तालुक्यातील निमोणे येथे घोडनदीच्या किनारी उसाच्या शेतात सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर शिरूर पोलिसांनी छापा टाकून टोयोटा ग्लान्झा कारसह एकूण ५ लाख ४१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली.

गोपनीय माहितीच्या आधारे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी भोसले व पथकाने गट क्रमांक ४८९ मधील उसाच्या शेतात छापा टाकला. यावेळी ४०० लिटर गावठी हातभट्टीचे कच्चे रसायन, पाच लिटर गावठी दारू, पाच लिटर केमिकलयुक्त ताडी, हातभट्टीचे साहित्य आणि चक-१२-नत्र-८१८४ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची टोयोटा ग्लांझा कार जप्त करण्यात आली. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.

या प्रकरणी लता जंबु चौघुले, प्रियंका राजेंद्र चौघुले, रवि जंबु चौघुले, विकी जंबु चौगुले आणि राजेंद्र रोहीदास चौघुले (सर्व रा. निमोणे) यांच्याविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३ व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलीस हवालदार टेंगले करीत आहेत.अवैध दारूनिर्मिती व विक्रीविरोधात शिरूर पोलिसांची जोरदार कारवाई सध्या सुरू आहे.

### प्रतिकार करणाऱ्या धंगेकर कुटुंबावर चोरट्यांचा जीवघेणा हल्ला



**दौंड :** दौंड तालुक्यातील नाथाचीवाडी येथे एकाच रात्री तीन ते ४ ठिकाणी चोरीचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या अज्ञात चोरट्यांनी राजेंद्र धंगेकर यांच्या घराच्या खिडकीतून हात घालून मुख्य दरवाजाची कडी अंतर्गत बाजूने उघडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला आणि राजेंद्र धंगेकर यांच्यावर चॉपरने जीवघेणा हल्ला केला. यावेळी पाच ते सहा अज्ञात चोरट्यांच्या हातात कोयता आणि इतर घातक शस्त्र असल्याचे धंगेकर यांनी सांगितले. या घटनेत धंगेकर यांच्यासह त्यांचे कुटुंब थोडक्यात बचावले असून परिसरात प्रचंड घबराट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात चोरट्यांनी नाथाचीवाडी परिसरात धुमाकूळ घालत एकाच रात्री ३ ते ४ घरांना लक्ष्य केले. चोरीच्या उद्देशाने घरात घुसलेल्या चोरट्यांना राजेंद्र धंगेकर यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. याचा राग अनावर झाल्याने चोरट्यांनी धंगेकर यांच्यावर चॉपरने थेट मानेजवळ जीवघेणा वार केला. एवढ्यावरच न थांबता चोरट्यांनी धंगेकर यांच्या पत्नीचा गळा दाबून त्यांना मारण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्या मुलीवर लोखंडी रॉडने हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

# भामा आसखेडमधून पाण्याचा विसर्ग; वाघोलीला दिलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** भीमा नदीची पाणीपातळी ऑक्टोबर महिन्यातच खालावल्याने शिरूर-हवेली तालुक्यातील भीमा नदीकाठच्या गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भामा आसखेड धरणातून शनिवारी (ता. २४) सकाळी दोन हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. त्यामुळे वढू खुर्द येथील बंधाऱ्यातून वाघोलीला पाणीपुरवठा करणारी योजना पूर्ववत होण्याची शक्यता असून, वाघोलीसह भीमा नदीकाठच्या गावांना दिलासा मिळणार आहे.

**विसर्गामुळे वढू खुर्द येथील बंधाऱ्यात पाणी उपलब्ध होऊन वाघोलीच्या पाणीपुरवठा योजनेला पुन्हा चालना मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच भीमा नदीकाठच्या इतर गावांनाही या पाण्याचा फायदा होण्याची शक्यता आहे.**
**–ज्ञानेश्वर कटके, आमदार**

भीमा नदीतील पाणीसाठा आटल्यामुळे परिसरातील प्रादेशिक आणि स्थानिक पाणीपुरवठा योजना बंद पडण्याच्या मार्गावर होत्या. नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे आणि उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन व्हावे, यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र देऊन धरणातून आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर भामा आसखेड धरणातून दोन हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

**पिण्याचे पाणी, सिंचन आणि पशुधनासाठी नियोजन :**

नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. शिरूर-हवेली तालुक्यासह आजूबाजूच्या गावांमधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची गरज होती. पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या सिंचनासाठी आणि पशुधनाच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार प्रशासनाने निर्णय घेऊन भामा आसखेड धरणातून दोन हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे.

### डिंभे धरणात ९९ टक्के पाणीसाठा, तरी शेतकऱ्यांवर दुष्काळाचे संकट!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**डिंभे :** पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या शेतीसाठी महत्त्वाच्या असलेल्या डिंभे धरणात सुमारे ९९ टक्के पाणीसाठा असतानाही पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांना पावसाच्या खंडाचा फटका बसत आहे. पाऊस नसल्याने भातासह अन्य पिके करपण्याची भीती निर्माण झाली आहे. धरणात पाणी असूनही स्थानिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी त्याचा थेट लाभ मिळत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडूनही सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी होत आहे. त्यामुळे धरणातील पाण्याचे नियोजन, स्थानिकांचा पाणीहक्क आणि प्रस्तावित पाणीवळण बोगदा हे मुद्दे पुन्हा चर्चेत आले आहेत. पावसातील दीर्घ खंडामुळे भातपिकाला आवश्यक ओलावा मिळत नसल्याने पिके करपून गेली आहे उत्पादनातही घट झाली आहे. धरणाच्या जवळ पाणी उपलब्ध असतानाही स्थानिक शेतजमिनींना सिंचनाचा लाभ मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

## अमली पदार्थांच्या विरोधात समाजाने सजग राहून एकत्र लढावे

### एनसीबीचे मुंबई विभागीय संचालक अमित घावटे यांचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिरूर:** अमली पदार्थांचा विळखा दिवसेंदिवस वाढत असून या गंभीर समस्येविरोधात समाजातल्या प्रत्येक घटकाने सजग राहून ठामपणे उभे राहिले पाहिजे, असे प्रतिपादन अमली पदार्थ नियंत्रण कक्षाचे (एनसीबी) संचालक अमित घावटे यांनी केले. शिरूर येथील सनशाईन सॅटर्डे क्लबच्या वतीने आयोजित 'अमली पदार्थांचा वाढता विळखा' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) माजी अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर होते. या वेळी पंतप्रधान कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी डॉ. अयाज तांबोळी आणि पोलीस उपअधीक्षक अनिल कटके आदी मान्यवर उपस्थित होते.आपल्या व्याख्यानात घावटे म्हणाले, अमली पदार्थांची समस्या आता केवळ शहरी भागापुरती मर्यादित राहिलेली नसून ग्रामीण भागातही तिचे लोण पसरले आहे. वाढता अंमली पदार्थांचा वापर देशाच्या सुरक्षेपुढे मोठे आव्हान उभे करत आहे. कोरोनाच्या काळानंतर नशेचे प्रमाण अधिक वाढल्याचे दिसून येत आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने अंमली पदार्थांविरोधातील लढा व्यापक केला असून, या समस्येचा २०२९ पर्यंत पूर्णपणे नायनाट करण्याचा संकल्प केला आहे.

**पालकांनी मुलांवर लक्ष ठेवावे**

तरुणांमधील आणि मुलांमधील वाढत्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त करत घावटे यांनी पालकांसाठी काही महत्त्वाच्या सूचना मांडल्या. पालकांनी आपल्या मुलांच्या वर्तनावर आणि दिनचर्येवर काळजीपूर्वक लक्ष ठेवले पाहिजे. मुले सोशल मीडियाचा वापर कसा करतात, कोणाच्या संपर्कात आहेत, ती एकांतात राहतात का, याकडे बारकाईने पाहावे. तसेच घरातील पैसे सुरक्षित आहेत का आणि पाल्याचा अचानक खर्च वाढला आहे का, तो तणावाखाली आहे का, या गोष्टी तपासाव्यात. पाल्यांच्या मित्रांच्या संगतीवरही लक्ष देऊन कोणतीही शंका आल्यास वेळीच योग्य उपाययोजना करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

अमली पदार्थांच्या विळख्यातून सुटका करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत. मात्र, या संकटाविरोधातील लढा यशस्वी करण्यासाठी संपूर्ण समाजाने एकत्र येऊन लढा देणे गरजेचे आहे, असे आवाहनही त्यांनी शेवटी केले.

या वेळी पंतप्रधान कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी डॉ. अयाज तांबोळी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**पोलीस उपअधीक्षक अनिल कटके यांचा विशेष सन्मान**

कार्यक्रमादरम्यान राष्ट्रपती पोलीस पदक प्राप्त पोलीस उपअधीक्षक अनिल कटके यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम प्रसंगी प्रास्ताविक किशोरराजे निंबाळकर यांनी केले, तर उपस्थितांचा परिचय व स्वागत डॉ. विक्रम घावटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश धुमाळ यांनी केले आणि आभार उदय शिंदे यांनी मानले.



## मनपा शाळांमध्ये ओळख श्री ज्ञानेश्वरी उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक, नैतिक आणि संस्कारक्षम मूल्यांची रुजवण व्हावी, या उद्देशाने वडगावशेरी येथील पुणे महानगरपालिकेच्या तीन शाळांमध्ये 'ओळख श्री ज्ञानेश्वरी आणि हरिपाठ' या उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष तथा 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' परिवाराचे समन्वयक प्रकाश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना हरिपाठाचे, तर इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' या माध्यमातून मूल्यशिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत तीनही शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने वर्गांचे आयोजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांची ओळख करून देत विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार रुजविणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

यावेळी नगरसेवक योगेश मुळीक, नारायण गलांडे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी विजय आवारी, माजी शिक्षणाधिकारी कृष्णकांत चौधरी आणि वडगावशेरी भजनी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब पाडाळे उपस्थित होते. तसेच उपक्रमाचे शिक्षक ह.भ.प. मारुती महाराज गलांडे, निताताई गलांडे, सुरेखाताई भांबुरे, मुख्याध्यापक अशोक लंघे, पूजा सोमवंशी, बाळासाहेब नवले यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

ज्ञानेश्वरीतील विचार आचरणात आणा

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या इच्छेने आणि प्रेरणेने आळंदीहून येऊन हा संस्कारक्षम उपक्रम सुरू करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सातत्य ठेवून ज्ञानेश्वरी आणि हरिपाठातील संस्कार आत्मसात करावेत, असे आवाहन प्रकाश मामा काळे यांनी केले. तर माजी शिक्षणाधिकारी कृष्णकांत चौधरी यांनी संतांच्या वाणीचे आणि ज्ञानेश्वरीतील विचारांचे केवळ श्रवण न करता त्यांचे लक्षपूर्वक चिंतन, मनन करून प्रत्यक्ष जीवनात आचरण करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांची जडणघडण व्हावी, या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक आणि ग्रामस्थांनी स्वागत केले. संत साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कारांचे बळ मिळणार असल्याने या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.



## पुरंदरच्या पूर्व भागात माळशिरस येथे बिबटयाचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** येथील पाटील वस्ती परिसरात रात्री नऊ वाजता अचानक बिबट्या दिसल्याने परिसरामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या महिन्यामध्ये श्री क्षेत्र भुलेश्वर मंदिराजवळील घाटात दोन ते तीन वेळा बिबटया दिसला.मात्र याकडे वन विभागाने दुर्लक्ष केले . पंधरा दिवसांपुर्वी रात्री दहा वाजता भुलेश्वर घाट रस्त्यावर वरच्या पहील्या वळणावर बिबट्या दिसला होता. दोन महिने पासून वारंवार रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांना दिसत आहे.सध्या माळशिरस परिसरात वीजेची रात्रपाळी असल्याने अनेक शेतकऱ्यांनी भीती पोटी रात्रीच्या वेळी शेताला पाणी देण्याचे सोडुन दिले आहे.बुधवारी दि. २१ रोजी रात्री नऊ वाजता माळशिरस येथील पाटील वस्ती परिसरात काही तरुणांना बिबट्या दिसला. तरुणांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने तेथून पळ काढला. यामुळे परिसरात सध्या घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभागाने वेळीच उपाययोजना करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### पाईपलाईनच्या गळतीवरून वाद

६० वर्षीय महिलेला मारहाण, सहा जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूरच्या बेट भागातील टाकळी हाजी येथील साबळेवाडी येथे पाईपलाईनच्या गळतीवरून झालेल्या वादातून ६० वर्षीय महिलेला शिवीगाळ व दमदाटी करून हाताने, लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी फळीने मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फुलाबाई राघु चव्हाण (वय ६०, रा. साबळेवाडी, टाकळी हाजी) यांच्या फिर्यादीनुसार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी पाईपलाईनमधून शेतात गळती होत असल्याच्या कारणावरून आरोपींनी वाद घालून मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी विलास गिरीधर चव्हाण, कांताबाई अंकुश शिंदे, कल्पना रमेश शिंदे, गिरीधर अप्पा चव्हाण, कैलास गिरीधर चव्हाण आणि लिलाबाई गिरीधर चव्हाण (सर्व रा. साबळेवाडी, टाकळी हाजी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ९६९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले यांची वळती गावाला भेट; ग्रामस्थांकडून सन्मान

**वळती :** वळती (ता. आंबेगाव) येथे दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी गावातील ग्रामस्थांनी त्यांचे उत्साहात स्वागत करून सन्मान केला.

या भेटीदरम्यान ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. पत्रकारिता, सामाजिक प्रश्न आणि ग्रामीण भागातील विविध समस्यांना प्रसिद्धी देण्याच्या अनुषंगाने यावेळी चर्चा झाली.करण नवले यांच्या वळती गावातील भेटीमुळे ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. यावेळी ग्रामस्थ व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## खामुंडीमध्ये 'उमेद' अंतर्गत चार व्यवसाय प्रकल्पांचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान 'उमेद' व एकात्मिक शेती विकास विभाग प्रकल्प अंतर्गत खामुंडी (ता. जुन्नर) ग्रामपंचायत येथे चार नवीन व्यवसाय प्रकल्पांचे उद्घाटन नुकतेच उत्साहात पार पडले.

ओतूर पिंपरी पेंढार प्रभागातील खामुंडी येथील स्वामिनी महिला ग्रामसंघातील बचत गटांतील महिलांनी एकत्रित येऊन हा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये धान्य खरेदी व विक्री केंद्र, रोपवाटिका, अंडी संकलन केंद्र आणि मांस विक्री केंद्र या चार व्यवसायांचा समावेश आहे. स्वामिनी महिला ग्रामसंघाने सुरू केलेल्या धान्य खरेदी-विक्री केंद्रातून गावातील तसेच परिसरातील शेतकऱ्यांकडून उच्च प्रतीचे धान्य, सोयाबीन, डाळी यांसारखा शेतमाल थेट खरेदी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव देण्याचा मानस आहे. हा उपक्रम महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. हा प्रकल्प उमेद, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती जुन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात आहे.

# श्री दत्त तादंळी सोसायटीच्या चेअरमनपदी दत्तात्रय खोरे

## माजी पदाधिकाऱ्यांनी अन्य संचालकांना संधी मिळावी म्हणून दिला पदाचा राजीनामा

### तर व्हा. चेअरमनपदी मोहन गदादे यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कवठे येमाई :** शिरूरच्या पूर्व भागातील श्री दत्त तादंळी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी दत्तात्रय झुंबरराव खोरे, तर व्हाईस चेअरमनपदी मोहन बबनराव गदादे यांची एकमुखाने बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे संस्थेच्या संचालक मंडळात नव्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे.संस्थेच्या माजी चेअरमन अनिता गदादे व माजी व्हाईस चेअरमन अलका बनकर यांनी संस्थेतील अन्य संचालकांनाही पदावर काम करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने आपल्या पदांचे राजीनामे दिले. त्यांच्या या निर्णयानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

यावेळी संस्थेचे संचालक दत्तात्रय अण्णा गदादे, शंकर भाऊ गदादे, फत्तेसिंग गदादे, मारुती सिताराम गदादे, गोरख काका खोरे, नंदू कुलकर्णी, ज्ञानदेव ढमढेरे, पोपट अण्णा आदींसह संचालक मंडळ उपस्थित होते.तसेच शिरूर पंचायत समितीचे माजी कार्यक्षम सदस्य राजेंद्र गदादे, श्याम अप्पा खोरे, शिवाजी खोरे, संभाजी खोरे, रामदास गदादे, दत्तात्रय नलगे, शंकर अण्णा गदादे, संस्थेचे सचिव शरद बनकर, कर्मचारी राजू बनकर, राजू ननवरे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पिसाळ साहेब यांनी काम पाहिले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित संचालक व सभासदांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मागच्या पंचवार्षिक निवडणुकीत ज्याचं केलं उदोउदो

# आता त्याच्याच पराभवासाठी करायचा आहे धावा...

**डॉ अफरोजखान पठाण । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत : राजकारणात कोण-कोणाचं मित्र नसतो. ना कोणाचा शत्रू. प्रेमात आणि युद्धात जसे माफ असते. तीच गत आता राजकारणात झाली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मागील पंचवार्षिकला ज्या अंबादास पिसाळ यांच्या विजयासाठी सभापती राम शिंदे (खा. सुजय विखेंसोबत) यांनी जीवाचे रान केले होते. आणि स्वप्नावत असणारा विजय सहज खेचून आणला होता. आता त्याच पिसाळांच्या पुत्राविरोधात राम शिंदेंनी पराभवाचे रणशिंग फुकले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अलीकडील काळातच राजकारण लय वंगाळ झालं आहे या वाक्याची आठवण कर्जतकरांना झाली आहे.**

यंदाच्या अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सर्वच प्रमुख नेत्यांनी चांगलेच लक्ष घातले. विखे-थोरात गटाची मक्तेदारी असणाऱ्या बँकेत यंदा नवखे राम शिंदेंसह खा. निलेश लंके देखील मैदानात उतरत एकमेकांच्या समोर तगडे आव्हान निर्माण केले आहे. मात्र यंदा जिल्हा बँकेत कायम एकमेकांच्या विरोधात असणारे विखे कुटुंब आणि माजीमंत्री बाळासाहेब थोरात हे कट्टर विरोधक एकत्र येत एकाच पॅनलमध्ये आपल्या उमेदवारांच्या विजयासाठी व्युव्हरचना आखत आहे. तर या दोघां प्रस्थापितांच्या विरोधात विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि खा. निलेश लंके या नवख्या नेत्यांनी तगडे आव्हान दिले आहे. कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघात मागील पंचवार्षिक निवडणुकीत आमदार रोहित पवारांच्या उमेदवार असणाऱ्या मीनाक्षी बाळासाहेब साळुंकेंच्या विरोधात विखे समर्थक असणारे अंबादास पिसाळ यांच्या विजयासाठी राम शिंदे- तत्कालीन खासदार सुजय विखे यांनी विरोधी गटातील मतदारांनाच गळाला लावत रोहित पवारांना पराभवाचा झटका दिला होता. हा पराभव रोहित पवारांसह दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या चांगलाच जिव्हारी लागला होता. तसे खडेबोल अजित पवार यांनी कर्जतच्या सभेसह मुंबईच्या बैठकीत सुनावले होते.

मात्र यंदा त्याच अंबादास पिसाळ यांच्या पुत्राविरोधात राम शिंदेंनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कंबर कसली आहे. राम शिंदे हा स्वताच्या निवडणुकीपेक्षा सर्वसामान्य जिवा-भावाच्या कार्यकर्त्यांच्या विजयासाठी ताकद पणाला लावतो याच उक्तीप्रमाणे ज्योती शिंदे यांना उमेदवारी जाहीर करीत तब्बल ४५ मतदारांना राज्याबाहेर सहलीसाठी नेले आहे. सगेसोयरे, नात्या-गोत्याच्या राजकारणात दगा फटका होऊ शकतो याची राम शिंदेंनी पुरेपूर खबरदारी घेतली असली तरी मागच्या निवडणुकीतील गनिमी-कावा ते विसरणार नाहीत याची देखील ते दक्षता घेताना दिसत आहे. वास्तविक पाहता जिल्हा बँक निवडणूक राम शिंदेंना नवखी असली तरी त्यांचा पंगा त्यांच्याच स्वपक्षातील पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि सहकार क्षेत्रातील मोठा अनुभव असणाऱ्या बाळासाहेब थोरात गटाशी आहे. या जोडीबरोबर राम शिंदेंना मतदारसंघातील विरोधक असणारे रोहित पवारांबरोबर देखील सामना करावा लागणार आहे. २ नोव्हेंबरला जिल्हा बँकेसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार असून ३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. यात कोणाची सहल फळाला लागते. की अनुभवाची जोडगोळी (विखे-थोरात) विजयी माळ गळ्यात घालते पाहणे रंजक ठरणार आहे.

**होय राजकारण वंगाळच आहे. यात कोण-कोणाचा मित्र नसतो... ना शत्रू**

बेरजेच्या राजकारणात स्थानिक नेते कोणत्याही दुय्यम नेत्यास आपल्या सोबत घेवू शकतात याचे अनेक उदाहरणे खालच्या निवडणुकीत सर्रास पहावयास मिळतात. मात्र त्या बेरजेत निष्ठावान कार्यकर्ता-नेता मागे राहतो. जामखेड नगरपरिषद निवडणुकीत राम शिंदेंनी चिंतामणी यांना ताकद देत सत्तेच्या खुर्चीवर विराजमान केले. तोच कित्ता त्यांनी जिल्हा बँकेत ज्योती शिंदेंना उमेदवारी देत गिरवला. मात्र या विधानसंभा निवडणुकीत खांद्यास खांदा लावत प्रचारात सर्वत्र फिरणाऱ्या विखे समर्थक अंबादास पिसाळांना राम शिंदेंनी चांगलेच खिंडीत गाठले.

**४५ आकडा शुभ की अशुभ निकालानंतरच कळेल**

जिल्हा बँकेच्या मागच्या पंचवार्षिक निवडणुकीत रोहित पवारांनी मीनाक्षी साळुंकेंसाठी ४५ च मतदार सहलीवर नेले होते. त्यातील तब्बल ९ उमेदवार फुटत त्यांनी विरोधी गटास मतदान केले होते. हा इतिहास विसरता येण्यासारखा नव्हे. तोच कित्ता यंदा राम शिंदेंनी आपल्या उमेदवारांसाठी गिरवला. त्यांनी पण ४५ मतदार सहलीवर रवाना केले आहे. त्यामुळे ४५ चा हा आकडा कोणाला शुभ ? राहील तो येणारा काळच सांगेल.

## अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून समुदाय सहभाग प्रकल्पाचे सादरीकरण



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी समर्थ गुरुकुल येथे (उएझ) समुदाय सहभाग प्रकल्प अंतर्गत विविध प्रकल्पांचे सादरीकरण केले.

या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांनी सेंद्रिय शेती, महिला सक्षमीकरण,सौर ऊर्जा, पाणी बचत आणि वृक्षारोपण अशा विविध सामाजिक व पर्यावरणपूरक विषयांवर प्रकल्प तयार केले. विद्यार्थ्यांनी या प्रकल्पांच्या माध्यमातून गुरुकुलमधील विद्यार्थ्यांना संबंधित विषयांची माहिती देऊन त्यांचे महत्त्व, फायदे आणि दैनंदिन जीवनातील उपयोग समजावून सांगितले.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना स्थानिक समुदायाच्या गरजा, समस्या आणि आव्हाने समजून घेऊन त्यावर उपयुक्त उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. अभियांत्रिकीतील तांत्रिक ज्ञान व कौशल्यांचा उपयोग समाजोपयोगी उपक्रमांसाठी करणे, महाविद्यालय आणि समाज यांच्यात सहकार्याचे नाते निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संघभावना आणि समस्या निराकरण कौशल्ये विकसित करणे ही या प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या उपक्रमाबद्दल वसंतराव शेळके, माऊली शेळके, विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, स्नेहलताई शेळके, राजीव सावंत, सतीश कुऱ्हे, एच.पी. नरसुडे यांनी आयोजक व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## द•ख•ल



### बुगेवाडीत 'खेळ पैठणीचा' उत्साहात

**पारनेर :** पारनेर शहरातील बुगेवाडी येथे दुर्गामाता युवा मंचच्या वतीने नवरात्र उत्सव २०२६ अंतर्गत सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी खास 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते नारळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. निवेदक उत्तम घोलप यांनी कार्यक्रमाचे खेळीमेळीच्या वातावरणात संचालन केले. यावेळी महिलांसाठी विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या महिलांना सोन्याची नथ, पैठणी तसेच विविध आकर्षक बक्षिसे देण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक प्रतिभा जालिंदर थोरात, द्वितीय क्रमांक स्वाती शंकर कावरे, तर तृतीय क्रमांक गीतांजली सतीश कावरे यांनी पटकाविला. आमदार काशिनाथ दाते यांनी कार्यक्रमास भेट देत उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या उपस्थितीत दुर्गामाता देवीची आरती करण्यात आली. यावेळी प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, अशोक चेडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विठ्ठल कावरे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल कावरे, हनुमंत बुगे, धनाजी थोरात, रामदास थोरात, कोंडीबा थोरात, विजय कावरे, यश बुगे, यश मते, विनायक घुगे, चैतन्य कावरे, प्रथमेश कावरे, मयूर कावरे, मंगेश कावरे, तेजस कावरे, अनिकेत कावरे, रोहित थोरात, निखिल कावरे, सखाराम बुगे, रामदास वाळुंज, ठकाराम बुगे, गणेश बुगे, सूरज बुगे, बाळासाहेब घुगे, भाऊ कावरे, सखाराम कावरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### स्नेहालय संस्थेचा निराधारांसाठी माहेरची साडीसामाजिक उपक्रम

**पारनेर :** वंचित महिलांच्या जीवनात आशेचा दिवा पेटवूया!दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा, प्रेमाचा आणि आपुलकीचा सण! प्रत्येक घरात दिव्यांची रोषणाई असते, गोडधोड पदार्थांचा सुगंध दरवळतो आणि नात्यांमधील स्नेह अधिक घट्ट होतो. पण समाजातील अनेक वंचित महिलांच्या आयुष्यात आजही संघर्षाचा अंधार आहे. त्यांच्या वाट्याला आनंदाचे चार क्षण यावेत, त्यांच्याही चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे आणि त्यांना मायेचा आधार मिळावा, यासाठी आपण सर्वांनी एकत्र येण्याची हीच वेळ आहे. स्नेहालय संस्थेचा 'माहेरची साडी' हा उपक्रम म्हणजे केवळ मदतीचा हात नव्हे, तर माणुसकीच्या नात्याने दिलेली मायेची ऊब आहे. यंदा या उपक्रमाचे २१ वे वर्ष असून, रविवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी स्नेहालयात हा उपक्रम आयोजित करण्यात येत आहे.साड्यांची व्यवस्था झाली आहे. आता आपल्या छोट्याशा योगदानातून या भगिनींची दिवाळी अधिक आनंददायी करण्यासाठी आपण पुढाकार घेऊया. त्यांच्यासाठी किराणा किट, दिवाळीचा फराळ आणि आरोग्य किट देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचे रंग भरूया. आपली मदत, त्यांच्यासाठी आनंदाची भेट!

### श्रीगोंद्यात विद्यार्थी संवाद मेळावा

**श्रीगोंदा :** शहरातील बाजारतळावरील बाळाजी मंगल कार्यालयात उद्या, सोमवारी (दि. २६ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता 'विद्यार्थी संवाद मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. सखी संमती फाऊंडेशनच्या वतीने आयोजित या मेळाव्यात विद्यार्थ्यांना शिक्षण, स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती आणि करिअर नियोजनाबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. कु. विवेकानंद पाटील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करणार आहेत. आ. हेमंत ओगले, तहसीलदार सचिन डोंगरे, कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजित खिससागर, प्रशांत ओगले आणि सौ. हेमांगी प्रशांत ओगले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडणार आहे. 'मी येतोय, तुम्ही पण या!' विद्यार्थ्यांना साद स्पर्धेच्या युगात करिअरची योग्य दिशा निवडणे, अभ्यासाचे नियोजन करणे आणि स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करणे, या बाबी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या ठरत आहेत. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, त्यांना आपले प्रश्न थेट मांडता यावेत आणि भविष्यातील संधींची माहिती व्हावी, हा या मेळाव्यामागील उद्देश आहे. 'मी येतोय, तुम्ही पण या!' या आपुलकीच्या आवाहनातून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. हा मेळावा केवळ भाषणांचा कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणारा आणि त्यांच्या भविष्याला दिशा देणारा संवाद ठरावा, यावर भर देण्यात आला आहे. श्रीगोंदा परिसरातील विद्यार्थी आणि पालकांनी उद्या सकाळी ११ वाजता बाळाजी मंगल कार्यालयात उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सखी संमती फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## करमनवाडी बंधाऱ्यात कुकडीचे पाणी सोडा सभापती व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नांदणी नदीवरील करमनवाडी कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यात कुकडी कालव्याचे पाणी नियमित सोडण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे आणि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन देण्यात आले. प्रत्येक कालवा रोटेशनमध्ये बंधाऱ्यात पाणी सोडण्याचे नियोजन करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या वेळी डॉ. विलास नामदेव राऊत, अ‍ॅड. मोहन कुंडलिक सायकर, बाळू राऊत, लहू सायकर, हरी राऊत, विशाल सायकर यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

कुकडी डावा कालवा, चिलवडी शाखा आणि राशीन उपचारीच्या माध्यमातून करमनवाडी बंधाऱ्यात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. बंधाऱ्यात नियमित पाणी उपलब्ध झाल्यास राशीनसह परिसरातील गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल. तसेच शेती आणि पशुधनासाठीही पाणी उपलब्ध होण्यास दिलासा मिळू शकतो. करमनवाडी बंधाऱ्यात कुकडीचे पाणी सोडण्यासाठी २०१७ पासून संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा सुरू असल्याचे निवेदनकर्त्यांनी सांगितले. यापूर्वी निवेदने, ग्रामपंचायतींचे ठराव आणि ग्रामस्थ-शेतकऱ्यांच्या सह्यांद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. मात्र, या मागणीवर ठोस निर्णय होऊन पाणी सोडण्याचे निश्चित वेळापत्रक जाहीर व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

राशीनसह अखोनी, वायसेवाडी आणि करमनवाडी परिसरातील नागरिकांना पाणीटंचाईतून दिलासा मिळण्यासाठी जलसंपदा विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, तसेच जिल्हा प्रशासनाने या प्रश्नाचा पाठपुरावा करावा, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. आता या मागणीवर संबंधित प्रशासन काय निर्णय घेते आणि बंधाऱ्यात प्रत्यक्ष पाणी कधी सोडले जाते, याकडे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## देवीने धन धान्याची समृद्धी करावी

### एस.टी.आगारातील कर्मचाऱ्यांची देवीपुढे प्रार्थना

**अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** मोहटादेवी हीच आपली रक्षण करती तेथे येणाऱ्या भाविकांमुळे आगाराच्या उत्पन्नात भर पडते. आपली रोजी रोटी देवीच्या कृपेने चालते अशा श्रद्धाभावाने गेल्या अनेक वर्षांपासून शारदीय नवरात्रोत्सवाच्या सांगतेला म्हणजे कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी पाथर्डी आगारातील कर्मचाऱ्यांतर्फे मोहटादेवीला मानाची साडी चोळी वाजत गाजत अर्पण केली जाते. श्रद्धा भक्ती व सेवेचा अनोखा संगम या कार्यक्रमातून शहरवासीयांसह भाविकांनी अनुभवला. बँड पथक संबळ वाद्य व देवीचा जयघोष कर्मचारी मोहटा देवस्थान मध्ये पोहोचले .

मोहटा देवीचे स्थान संपूर्ण तालुक्यातील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. अश्विन शुद्ध प्रतिपदा ते कोजागिरी पौर्णिमा अशी पंधरा दिवस तीन टप्प्यांमध्ये यात्रा पार पडते. पाथर्डीचे आगार स्थापन झाल्यापासून देवीला साडी चोळी अर्पण करण्याची प्रथा त्यावेळी पासून सर्व कर्मचाऱ्यांकडून पाळली जाते. यासाठी सर्वजण सेवा कार्य म्हणून हातभार लावतात. बँड पथकाचा मधुर स्वर, फटाक्यांची आतिश बाजी, देवीचा जयघोष, करत सर्व कर्मचाऱ्यांनी आगारातून वाजत गाजत मिरवणूक काढली. लक्ष्मीचे प्रतीक म्हणून नव्यानेच आगारात दाखल झालेली जिजाऊ बस उत्कृष्टपणे सजवण्यात येऊन पुढील भागावर देवीचे मोठे पोस्टर लावण्यात आले. सर्व उपस्थित कर्मचारी घरातील मंगल कार्य असावे अशा पद्धतीने नटून थटून बस मध्ये येऊन बसले. जुन्या बस स्थानकावर संपूर्ण आवारामध्ये गोलाकार प्रदक्षिणा घेत उपस्थित सर्व प्रवाशांना वंदन केले. पाथर्डी एसटी अगर खऱ्या अर्थाने तालुक्याचे भूषण असून विविध तीर्थक्षेत्रांची सेवा करण्याचे भाग्य या आगाराला लाभले आहे. सर्व कर्मचारी व अधिकारी सेवाभावी वृत्तीने सहकार्य करतात. आगाराने लांब पल्ल्याच्या नियमित गाड्या मोहटादेवी देवस्थानतून काही प्रमाणात सुरू कराव्यात. त्याला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन देवस्थान समितीच्या प्रशासनातर्फे देण्यात आले. एसटी कामगार संघटनेचे आगाराचे अध्यक्ष अंबादास शिरसाठ, अलीम पठाण, किरण गारुडकर, अर्जुन शिरसाठ, दत्ता खेडकर, रेवणनाथ जाधव, पांडुरंग धायतडक, विठ्ठल कंठाळे, महिला कर्मचारी वर्षा घोरपडे, आशा जगताप, राणी माळी, दिपाली बागडे, वैशाली वायकर, मनीषा गिरी, राधा माळी, बाळासाहेब सोनटक्के , आदी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांच्या उसाला प्रती टन ५ हजार रुपये दर मिळावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** दिवाळी पूर्वी मागील गळीत हंगामातील ऊस बिलाची प्रती टन ५०० रुपये थकीत रक्कम तात्काळ मिळावी. तसेच चालू गळीत हंगामासाठी ५ हजार प्रती टन उसाला दर मिळावा या आशयाची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आली. सदरचे निवेदन अंबालिका शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड व्यवस्थापकीय मंडळास देण्यात आले असून यावेळी लालासाहेब सुद्रीक, संजय तोरडमल, सुभाष भगत, अशोक जगताप, जयराम निळे आदी उपस्थित होते.

अंबिकानगर (ता.कर्जत) येथील अंबालिका शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड साखर कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मागील गळीत हंगामातील ऊस बिलापोटी थकीत असणारी ५०० रुपये प्रती टन रक्कम आजमितीस देणे बाकी असून सदरची रक्कम शेतक- यांना दिवाळीपूर्वी तात्काळ अदा करण्यात यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटना कर्जतच्यावतीने रविवारी करण्यात आली. यासह सध्या शेतीसाठी लागणारे खते, औषधे, मजुरी, मशागत, वाहतूक तसेच इतर खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ऊस उत्पादनासाठी शेतकऱ्यांना मोठा आर्थिक खर्च करावा लागत असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा ऊस दर परवडणारा असावा. यावर्षी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या उसास किमान प्रती टन ५ हजार रुपये दर मिळावा.

## दुष्काळावर मात करण्यासाठी कानगुडे यांचा कृती आराखडा!

### ७५ हजार मजुरांना रोजगार देण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** कर्जत तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करून शेतकरी, शेतमजूर आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी रोजगार हमीची कामे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, कुकडी प्रकल्पाच्या कालव्यांची स्वच्छता आणि चारा टंचाईवर उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी स्वाभिमानी सकल मराठा बहुजन विचार मंच, कर्जत-जामखेडचे इंजि. शिवश्री दिलीपराव कानगुडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनासमोर सविस्तर कृती आराखडा मांडला असून, दररोज सुमारे ७५ हजार मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट प्रस्तावित केले आहे.

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग, कुकडी प्रकल्प आणि सामाजिक वनीकरण विभाग यांनी समन्वयाने रोजगारनिर्मितीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी कानगुडे यांनी केली आहे.

अशा प्रकारे एकूण ७५ हजार मजुरांना दररोज रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट मांडण्यात आले आहे. हे प्रस्तावित उद्दिष्ट असून, प्रत्यक्ष रोजगार उपलब्धता ही मंजुरी, निधी, कामांची उपलब्धता आणि संबंधित योजनांच्या नियमांवर अवलंबून राहील.

कर्जत तालुका कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत असल्याने कालव्यांच्या देखभाल-दुरुस्तीला महत्त्व आहे. कुकडी प्रकल्पाच्या चाऱ्यांची स्वच्छता, झाडेझुडपे काढणे, गाळ काढणे आणि किरकोळ दुरुस्तीची कामे नियमानुसार रोजगार हमी योजनेतून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

या कामांमुळे कालव्यांची पाणीवहन क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर स्थानिक मजुरांना रोजगार मिळून जलसंधारण आणि सिंचन व्यवस्थेलाही हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तलावांतील गाळ काढणे, रस्त्यांचे मजबुतीकरण, जलसंधारणाची कामे आणि पाणलोट क्षेत्र विकास यांनाही प्राधान्य देण्याची सूचना करण्यात आली आहे. कर्जत तालुक्यातील रेहेकुरी अभयारण्य परिसरात तसेच पिंपळवाडी, टाकळी खंडेश्वरी आणि इतर गावांमध्ये वृक्षलागवड व मृदसंधारणाची कामे हाती घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. याकडे कर्जत तालुक्यातील शेतकरी व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## गौरी शुगरमध्ये बॉयलर अग्नीप्रदीपनासह गळीत हंगामाचा शुभारंभ

### दिवाळीनिमित्त ऊस उत्पादकांना मोफत साखर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** तालुक्यातील हिरडगाव येथील गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि. युनिट क्रमांक ४ मध्ये बॉयलर अग्नीप्रदीपन, गळीत हंगाम आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोफत साखर वाटपाचा शुभारंभ ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन तथा अशोक नागरी सहकारी बँकेचे संस्थापक बाबुराव बोत्रे पाटील आणि रेखाताई बोत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ओमराजे बोत्रे, तेजस्विनी बर्गे यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

दिवाळीच्या सणानिमित्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोफत साखर देण्याचा उपक्रम राबविण्यात येत असून, शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याचा प्रयत्न कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले की, यंदाच्या गळीत हंगामात ऊस उत्पादकांना उच्चांकी बाजारभाव देण्याचा आणि ऊस गाळपानंतर आठव्या दिवशी बिल अदा करण्याचा मानस आहे. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून कारखानदारी अधिक सक्षम करण्यावर भर राहील.आपल्या व्यावसायिक प्रवासाविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, सोसायटीतील कामगार म्हणून सुरुवात केल्यानंतर विविध अधिकारी आणि व्यक्तींशी संपर्क वाढत गेला.

शिरूरचे माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांच्या माध्यमातून वरिष्ठ पातळीवर ओळख झाली. केवळ पैसा असून व्यवसाय उभा राहत नाही, तर विश्वासाची नाती आणि योग्य संपर्कही व्यवसायाच्या विस्तारासाठी महत्त्वाचे असतात, असे त्यांनी नमूद केले.कारखानदारीला बदनाम करण्याचे प्रयत्न झाल्याचा आरोप करताना त्यांनी काही व्हिडिओ व्हायरल करून अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगितले. सभासदांच्या ठेवींबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडली. मोठ्या आर्थिक उलाढालीचा व्यवसाय करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो; मात्र त्यातून मार्ग काढण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोत्रे पाटील यांनी प्रस्तावित मेडिकल कॉलेज लवकरच सुरू करण्याचा मानस व्यक्त केला.

मेडिकल कॉलेजच्या माध्यमातून ऊस शेतकऱ्यांना मोफत रुग्णसेवा उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. साखर कारखानदारीबरोबरच बँकिंग आणि तेल व्यवसायासह विविध क्षेत्रांसह शेअर मार्केटमध्ये ओंकार समूहाने विस्तार केला असल्याचे सांगत त्यांनी व्यवसायवृद्धीमागील नियोजन आणि परस्पर संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले.

गळीत हंगामाच्या शुभारंभामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या असून, घोषित उच्चांकी दर आणि आठव्या दिवशी ऊस बिल देण्याच्या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री


## कोईमतूर येथील नॅशनल रोल बॉल स्पर्धेत श्रीरामपूरच्या तनिष्काला कांस्यपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : तमिळनाडूतील कोईमतूर येथे दिनांक १७ ते २० ऑक्टोबर दरम्यान पार पडलेल्या राष्ट्रीय) रोल बॉल स्पर्धेत श्रीरामपूर येथील तनिष्का अमोल राऊत हिने अत्यंत चमकदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. रोलर स्पोर्ट्स सोशल अकॅडमीतर्फे खेळताना तिने या राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदकासह ट्रॉफी आपल्या नावावर करत श्रीरामपूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तनिष्का राऊत ही श्रीरामपूरच्या डहाणूकर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत असून, तिने शालेय शिक्षणाइतकीच क्रीडा क्षेत्रातही महत्त्वाची मजल मारली आहे. तिला अनेक महाराष्ट्र रोल बॉल संघटनेचे संस्थापक राजु, संघटनेचे प्रताप पागर, सचिव सोमनाथ घुगे, आंतरराष्ट्रीय रोल बॉल पंच तथा राष्ट्रीय प्रशिक्षक आनंद पटेकर, तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत भंडारी, प्रियंका खराडकर आणि क्रीडा शिक्षक महेश खंडागळे यांसह स्टेट लेव्हल चॅम्पियन अथांग अमोल राऊत यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. तनिष्का ही उद्योजक सतोबा राऊत आणि लक्ष्मीबाई राऊत यांची नात आहे. तिच्या या राष्ट्रीय पातळीवरील उल्लेखनीय यशाबद्दल दत्तात्रय तापोळे, वाल्मिक वाघमारे, राहुल डुकरे, संदीप गव्हाणे, अनिल कुर्हे, आयुष आशिष बागुल आणि मनिषा अमोल राऊत आदिंनी अभिनंदन केले.



# कॅल्शिअमच्या गोळ्या सांगून पत्नीला ब्लेडचे तुकडे खाऊ घातले

## पतीला सात वर्षे सक्तमजुरी

### वैद्यकीय पुरावे ठरले महत्त्वाचे

ब्लेडचा तुकडा प्राणघातक ठरू शकत होता आणि त्यामुळे महिलेचा मृत्यूही होण्याची शक्यता होती, अशी साक्ष डॉक्टरांनी न्यायालयात दिली. केवळ एखादा साक्षीदार फितूर झाला म्हणून त्याची संपूर्ण साक्ष नाकारता येत नाही. उपलब्ध वैद्यकीय पुरावे आणि अन्य साक्षीदारांचे जबाब गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहेत, असा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला.




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

पुणे : पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला कॅल्शिअमच्या गोळ्या असल्याचे भासवत कॅप्सूलमधून ब्लेडचे तुकडे खाऊ घालून जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला न्यायालयाने सात वर्षे सक्तमजुरी आणि ७० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सोमनाथ साधू सपकाळ (वय ४५) असे दोषी ठरविण्यात आलेल्या पतीचे नाव आहे. पत्नीने न्यायालयात पतीविरोधातील आरोप नाकारले असतानाही वैद्यकीय पुरावे आणि अन्य साक्षीदारांच्या जबाबांवरून न्यायालयाने हा निकाल दिला.

ही घटना २०२३ मध्ये घडली होती. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत आरोपीने तिला कॅल्शिअमच्या गोळ्या असल्याचे सांगून कॅप्सूलमधून ब्लेडचे तुकडे खाऊ घातल्याचा आरोप होता. ऑक्टोबर २०२३ मध्ये पत्नीच्या पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. दोन वेळा शौचावाटे ब्लेडचे तुकडे बाहेर पडले. त्यानंतर ८ नोव्हेंबर रोजी त्रास वाढल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत तिच्या पोटात ब्लेडचा आणखी एक तुकडा आढळून आला. तपासादरम्यान हा प्रकार पतीने केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर उत्तमनगर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. या प्रकरणाची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध गांधी यांच्या न्यायालयात झाली.

खटल्याच्या सुनावणीदरम्यान पत्नीने पतीविरोधातील आरोप नाकारले. त्यांच्यातील वाद मिटल्याचेही तिने न्यायालयात सांगितले. मात्र, सरकारी पक्षाने वैद्यकीय पुरावे आणि अन्य साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्याचा युक्तिवाद केला.

या प्रकरणात सरकारी वकील अॅड. पाठक यांनी सात साक्षीदार तपासले. न्यायालयाने उपलब्ध पुरावे आणि साक्षींचा विचार करून आरोपीला दोषी ठरविले. पत्नीने आरोप नाकारले असतानाही वैद्यकीय पुराव्यांच्या आधारे दोष सिद्ध झाल्याने या निकालाकडे लक्ष वेधले जात आहे. न्यायालयाने आरोपीला सात वर्षे सक्तमजुरी आणि ७० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

## सोनई पोलिसांकडून दुचाकी चोरणाऱ्या दोघांना अटक, तीन दुचाकी जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिंगणापूर** : सोनई परिसरात दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी सोनई पोलिसांनी कारवाई करत दुचाकी चोरी करणाऱ्या दोघांना अटक केली आहे. संशयित आरोपींकडून चोरीच्या तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, न्यायालयाने दोघांनाही चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ ऑक्टोबर रोजी रात्री ९ ते २० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान सोनई येथील महेश वस्त्रालयासमोरील परिसरातून एका दुचाकीची चोरी झाली होती. यामध्ये लाल रंगाची टीव्हीएस कंपनीची स्कूटी तसेच सोनई परिसरातून अन्य दुचाकी चोरीला गेल्याच्या घटना घडल्या होत्या.

या प्रकरणाचा तपास सुरू असताना सोनई पोलिसांनी मार्गदर्शक सूचनांनुसार तपासाची चक्रे वेगाने फिरवली. मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी संशयितांचा शोध घेतला. या कारवाईत संजय वैरागर (वय २३, रा. लक्ष्मीनगर, सोनई) आणि साई रावसाहेब पगारे (वय २६, रा. सावळीविहीर बुद्रुक, ता. राहाता) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी दोघांकडे चौकशी केली असता त्यांनी मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने पुढील तपासासाठी दोघांनाही चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

### एक लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त

या कारवाईत पोलिसांनी सुमारे एक लाख १५ हजार रुपये किमतीच्या तीन दुचाकी जप्त केल्या आहेत. यामध्ये ४० हजार रुपये किमतीची लाल रंगाची टीव्हीएस स्कूटी, ५० हजार रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची टीव्हीएस वेगो मोटारसायकल आणि २५ हजार रुपये किमतीची बजाज बॉक्सर मोटारसायकल यांचा समावेश आहे.

चोरीच्या दुचाकींचा शोध घेऊन त्या जप्त करण्यात पोलिसांना यश आले असून, या प्रकरणात आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

सोनई पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रकरणाचा तपास केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव तसेच पोलीस अंमलदार व कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस अंमलदार बी. एम. तगाड करीत आहेत.

सोनई परिसरात दुचाकी चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## दुग्ध व्यवसायालाही दुष्काळाच्या झळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : दुष्काळाच्या संकटाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असतानाच आता शेतीला आधार देणारा दुग्ध व्यवसायही अडचणीत सापडला आहे. पावसाने दडी मारल्याने हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण झाली असून, पाण्याचेही भीषण संकट उभे ठाकले आहे. परिणामी शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव परीसरात दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो.दैनंदिन हजारो लिटर दूध संकलन केंद्रांवर जात होते. मात्र मात्र दुष्काळी परिस्थितीमुळे चा-याचे व पेंड व वालीस पुरक पशुखाद्य दर गगनाला भिडले असून त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पुर्णपणे कोलमडले आहे.

चाऱ्याची टंचाई अशीच कायम राहिल्यास दूध उत्पादनात आणखी घट होण्याची भीती दुग्धव्यवसायिकाकडुन व्यक्त होत आहे. दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. पावसाअभावी खरीप पिके जळून गेली असून, कांदा उत्पादक, फळबागायतदार, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांसह शेतमजुरांवरही आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत शेतीला जोडधंदा म्हणून आधार देणारा दुग्ध व्यवसायही आता संकटाच्या गर्तेत सापडला आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह दूध व्यवसायावर अवलंबून आहे. मात्र,



हिरवा चारा उपलब्ध होत नसल्याने जनावरांच्या खाद्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

पाण्याची उपलब्धताही कमी झाल्याने पशुपालकांना जनावरांचा सांभाळ करणे कठीण झाले आहे. पशुखाद्यावरील खर्च वाढत असतानाच दूध उत्पादन जनावरांच्या खरेदी-विक्रीवरही परिणाम दुष्काळामुळे जनावरांच्या खरेदी-विक्रीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. चारा-पाण्याअभावी जनावरे विकण्याची वेळ आली, तरी त्यांना खरेदीदार मिळणार का, असा प्रश्न पशुपालकांसमोर उभा ठाकला आहे. वर्षानुवर्षे सांभाळलेल्या गाई-म्हशींचे पालनपोषण कसे करायचे, या चिंतेने शेतकरी ग्रासले आहेत.

सद्यस्थितीत पशुधन जगविणे जिकिरीचे झाल्याने शासनाने चारा डेपो ,चारा छावण्या त्वरित सुरू करण्यात याव्यात अन्यथा जनावरे जगविणे मुश्किल बनले आहे.असे दुग्ध व्यवसायिकामधुन बोलले जात आहे.

## म्हैसगाव ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात ग्रामस्थ आक्रमक । कार्यालयासमोर बसून निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव ग्रामपंचायतीच्या विस्कळीत कारभाराच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर बसून निषेध व्यक्त केला. कार्यालय नियमित सुरू राहत नसल्याने नागरिकांची कामे रखडत आहेत. ग्रामसेवकांच्या बदल्यानंतरही पदभार हस्तांतरणाचा प्रश्न कायम असून, बंद पथदिवे, रखडलेली विकासकामे आणि मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामपंचायत कार्यालय अनेकदा बंद असते, तर ग्रामसेवक १५ ते २० दिवस कार्यालयात उपस्थित राहत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित ग्रामसेवकाची पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडून बदली करण्यात आली. मात्र, नव्याने नियुक्त ग्रामसेवकाकडे अद्याप पदभार हस्तांतरित झालेला नसल्याने कामकाज विस्कळीत झाल्याचे सांगण्यात येत आहे. आवश्यक कागदपत्रे व अभिलेखांच्या उपलब्धतेबाबतही प्रश्न उपस्थित केले जात असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी



करून पदभार हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी होत आहे.

### दुष्काळात विहिरींची कामे रखडल्याचा आरोप

गावात दुष्काळी परिस्थिती असताना पाणी उपलब्धतेसाठी आवश्यक विहिरींची कामे रखडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाणीटंचाईच्या काळात जलसंधारण आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित कामांना प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, दलित वस्ती तसेच म्हैसगाव ते विधाटे आणि आग्रेवाडी परिसरात लाखो रुपये खर्चून बसविलेले पथदिवे बंद असल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. आग्रेवाडी परिसरात यंत्रसामग्री असल्याने प्रकाशव्यवस्था आवश्यक असतानाही दिवे बंद असल्याबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

### कर्मचाऱ्यांच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह

उपसरपंच शिवाजी बर्डे यांनी कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना देऊनही कामकाजात सुधारणा होत नसल्याचे सांगितले. आठवडे बाजाराच्या महसुलाची वसुली होत नसल्याची तक्रारही त्यांनी केली. पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना लेखी नोटीस दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामपंचायत कार्यालय नियमित सुरू ठेवणे, नव्या ग्रामसेवकाकडे पदभार सोपविणे, बंद पथदिवे सुरू करणे आणि रखडलेली विकासकामे मार्गी लावण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष विलासराव गागरे, ग्रामपंचायत सदस्य भीमाशंकर दुधाट, अशोक कर्डे, नामदेव गावडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रशासन या तक्रारींची दखल घेऊन काय कार्यवाही करणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या एमबीबीएस तुकडीचा उद्या स्वागत समारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या पहिल्या एमबीबीएस तुकडीसह फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या २३व्या एमबीबीएस तुकडीचा या वेळी स्वागत समारंभ होणार आहे. या कार्यक्रमाला अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कर्करोगतज्ज्ञ आणि पद्मभूषण पुरस्कारप्राप्त डॉ. दत्तात्रेयुदु नोरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे पालक म्हणूनही त्यांची भूमिका आहे.

राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री आणि डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष व कुलपती राधाकृष्ण विखे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे माजी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर आणि लोणी येथील प्रवरा वैद्यकीय विज्ञान संस्थेचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसेच डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठाचे सहकुलपती, विश्वस्त व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील आणि विश्वस्त शालिनीताई विखे पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सोमवारी सकाळी १०.३० ते दुपारी १ या वेळेत अहिल्यानगर येथील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या नव्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांना या समारंभातून मार्गदर्शन मिळणार आहे.

## नेवासा बाजारात कांद्याला कमाल ४ हजार ५०० रुपयांचा भाव



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या कांदा लिलावात कांद्याला कमाल ४ हजार ५०० रुपये, तर सरासरी ४ हजार १५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. या दिवशी बाजार समितीत एकूण १५५ वाहनांतून कांद्याची आवक झाली असल्याची माहिती मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली. बाजार समितीच्या लिलावात कांद्याला मिळालेल्या दरांनुसार ४ हजार १ ते ४ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल दराच्या श्रेणीत ७३ वाहनांतील कांद्याची विक्री झाली. ३ हजार ५०१ ते ४ हजार रुपये दराच्या श्रेणीत ५१ वाहने, ३ हजार १ ते ३ हजार ५०० रुपये दराच्या श्रेणीत १४ वाहने, २ हजार ५०१ ते ३ हजार रुपये दराच्या श्रेणीत १० वाहने, तर १ हजार ७०० ते २ हजार ५०० रुपये दराच्या श्रेणीत ८ वाहने दाखल झाली. बाजार समितीमध्ये झालेल्या लिलावात बद्दल, गोल्टी, गोळटा व सुपर मालाचाही समावेश असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली उपसभापती नानासाहेब नवघर आणि सचिव देवदत्त पालवे व सर्व संचालक मंडळ मार्केट कमिटीच्या माध्यमातून जास्तीत जास्त भाव मिळावा यासाठी कार्यरत आहेत.

# श्रद्धेच्या हातांनी गोदावरीला दिला स्वच्छतेचा साज!

## आव्हाणे बुद्रुकच्या दीडशे महिला व ग्रामस्थांचे श्रमदान । एकादशीला नदीपात्रातून दोन टन कचरा हटविला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव** : गोदावरीच्या पाण्यात हात जोडून नमस्कार करणारे अनेक हात आपण पाहतो; मात्र त्याच गोदावरीच्या पात्रात उतरून तिची स्वच्छता करणारे हात समाजाला नवी दिशा देतात. धार्मिक श्रद्धेला सामाजिक बांधिलकीची जोड देत शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बुद्रुकच्या दीडशे महिला व ग्रामस्थांनी पैठण येथील गोदावरी नदीपात्रात उतरून स्वच्छता अभियान राबविले. एकादशीच्या निमित्ताने तब्बल तीन तास श्रमदान करत त्यांनी सुमारे दोन टन कचरा हटविला आणि गोदावरीप्रती कृतज्ञता व्यक्त केली. दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण येथे एकादशीला दर्शनासाठी आणि धार्मिक विधींसाठी हजारो भाविक येतात. मात्र, श्रद्धेपोटी नदीपात्रात अर्पण केलेल्या वस्तू, प्लास्टिक, जुन्या फोटोफ्रेम, कपडे आणि तुटलेल्या मूर्तींमुळे नदीच्या स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. नदीचे पावित्र्य जपणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक भाविकाचे कर्तव्य



आहे, या भावनेतून आखेगाव येथील जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रमुख राम महाराज झिंजुर्के यांनी दोन वर्षांपूर्वी स्वच्छता अभियानाचा उपक्रम सुरू केला.

### गोदावरीच्या स्वच्छतेतून जपली श्रद्धा

नदीला पवित्र मानणे म्हणजे तिचे पाणी आणि पात्र स्वच्छ ठेवणेही होय. आव्हाणे बुद्रुकच्या महिला व ग्रामस्थांनी श्रमदानातून हा विचार कृतीत आणला. धार्मिक भावनेला पर्यावरण संवर्धनाची जोड मिळाल्यास श्रद्धा समाजहिताचे प्रभावी माध्यम ठरू शकते, हे या अभियानाने दाखवून दिले.

दर महिन्याच्या एकादशीला शेवगाव तालुक्यातील एका गावातील भाविकांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले जाते. अश्विन एकादशीला आव्हाणे बुद्रुकच्या ग्रामस्थांनी या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बाजार समितीचे संचालक संजय कोळगे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आणि ग्रामस्थांनी नाथघाट परिसरात प्रत्यक्ष नदीपात्रात उतरून स्वच्छता केली. प्लास्टिकच्या बाटल्या, काचा, जुन्या फोटोफ्रेम, कपडे आणि तुटलेल्या मूर्ती असा सुमारे दोन टन कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली.

धार्मिक सण केवळ पूजा, अर्चा आणि दर्शनापुरते मर्यादित न राहता त्यातून समाजोपयोगी कार्य घडावे, हा संदेश या श्रमदानातून देण्यात आला. राम महाराज झिंजुर्के यांच्या कीर्तनाने अभियानाची सांगता झाली. श्रद्धा केवळ नतमस्तक होण्यात नाही, तर जपण्यातही! गोदावरीला स्वच्छ ठेवण्याचा संकल्प प्रत्यक्ष कृतीत उतरवून आव्हाणे बुद्रुकच्या ग्रामस्थांनी समाजासमोर आदर्श ठेवला आहे. नागरिकांनी पुढाकार घेतल्यास सार्वजनिक स्वच्छतेचे उपक्रम लोकचळवळ बनू शकतात, असे संजय कोळगे यांनी सांगितले. या अभियानात संजय कोळगे, मोहन कोळगे, साईनाथ झाडे, विनोद धुमाळ, प्रमोद म्हस्के यांच्यासह अनेक ग्रामस्थ आणि महिलांनी सहभाग नोंदविला.